

# मला काही सांगाचंय

## भाग २

प्रफुल शेजव

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे


प्रफुल राजेंद्रराव शेजव

लिखित


कादंबरी

# मला काही सांगाचंय... भाग 2

## मला काही सांगाचंय... भाग २

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मला काही सांगाचंय... भाग २ (कादंबरी)

लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail. com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २६ फ़ेब्रुवारी २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .



प्रिय रसिक वाचकांनो,

सर्वप्रथम आपल्या सर्वांचे मनापासून आभार... , " मला काही सांगाचंय " या कादंबरीच्या पहिल्या भागास आपण वाचकांनी कमी वेळात इतका उत्तम प्रतिसाद दिला. वाचकांनी पाठवलेले ईमेल वाचून खरंच खूप आनंद झाला तर कित्येक वाचक फोनवर बोलून त्यांच्या भावना व्यक्त करतात हा अनुभव माझ्यासाठी अगदी नवीन आणि आगळावेगळा होता... असा हा प्रतिसाद अनपेक्षित होता म्हणून जमेल तितक्या लवकर पुढचा भाग तयार करून आपल्या पर्यंत पोहोचवण्यात किती आनंद होत आहे हे शब्दात वर्णन करणे अशक्य... !

या भागाकरिता आपणांस वाट पाहावी लागली त्याकरिता आपण मोठ्या मनाने मला माफ कराल आणि हा भाग आपणांस आवडेल या अपेक्षेने... " मला काही सांगाचंय - भाग दोन "

त्याचबरोबर वेळोवेळी मला मार्गदर्शन करणारे माननीय सुनिल सामंत सर आणि संपूर्ण ई साहित्य प्रतिष्ठान टीमचे आभार...

धन्यवाद... !


लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail. com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

अर्पणपत्रिका

मी आज जे काही आहे त्याचं सम्पूर्ण श्रेय माझ्या आई वडिलांना जातं... ज्यांच्या मेहनत आणि आशीर्वाद मी घडलो... तसेच मला खूप प्रेम करणाऱ्या माझ्या ताई आणि लहान भावाला... त्यांना आणि मैत्रीच्या धाग्यात मोत्यासमान ओवलेल्या सर्व मित्रांना तसेच सर्व अमूल्य नात्यांना समर्पित...

## अनुक्रमणिका: भाग १


१. शेवटचा संवाद...?

२. घात कि अपघात?

३. अघटित

४. पूर्वकल्पना

५. वास्तव अवास्तव

६. परिचय

७. आसवांची परीक्षा

८. कुमारची डायरी

९. डायरीचं गूढ

१०. मध्यरात्र

११. एक नवीन पहाट

१२. शेवट कि सुरुवात?

**भाग १ चा शेवट ....**

बराच वेळ असाच निघून गेला... पण ती कुमारचा अपघात झाला असे कळल्यावर त्या आकस्मिक धक्क्याने जशी खाली बसली तशीच होती... फोन लावला तेव्हा टीव्ही चा आवाज बंद करून ठेला असल्याने त्यावर येणारे मूक चित्र तसेच बदलत होते... त्यावर ठेवलेली शोभेची फुलं आधीच निर्जीव होती... भिंतीवर लावलेली छायाचित्र बोलकी वाटत होती पण तो केवळ भास होता... जवळच टिक टिक करणार घड्याळं तेवढं शांत नव्हतं... तर ती फोन लावण्याआधी ज्या खुर्चीवर बसून होती आता त्याच खुर्चीवर एक हात ठेवून... दोन्ही पाय मागे करून... झटक्याने अचानक खाली बसल्याने तिची लांबलचक वेणी मागे जाऊन फरशीला स्पर्श करीत... भान हरपून बसलेली... बाजूला असलेल्या सोफ्यावर टीव्ही रिमोट तसंच पडलेलं...

सगळीकडे शांतता पसरली होती... फोनवर मेसेज आल्याने ती भानावर आली... आजूबाजूला नजर फिरवत तिने गालावरची आसवं पुसली... स्वतःला सावरत ती खुर्चीचा आधार घेत उभी झाली... खुर्चीवर बसून जरा वेळ मन शांत करत तिने रिमोटने टीव्ही बंद केला... मग मोबाईल हाती खेळून मेसेज पहिला तर तो कस्टमर केयर कडून आल्याचं तिला कळलं... जरा वेळ निघून गेला मग तिने टीव्ही चं बटन बंद केले... किचनमध्ये जाऊन थंड पाणी पित बॉटल तशीच हाती घेऊन सोफ्यावर येऊन बसली...

आता ती सावरून विचार करत होती... काय चाललंय हे चार वर्षानंतर...? कशाचा शेवट आहे ना...? जे नव्हतंच कधी जीवनात त्याचा शेवट... कि जे काय बाकी आहे त्याची नवीन सुरुवात...? काही कळत नाही... !

असे विचार तिला सारखे सतावत होते... मग मन आवरून ती उठून उभी झाली आणि स्वतःशीच पुटपुटली...

" मला भूतकाळात काय झालं हे विसरून मैत्रीच्या नात्याने कुमारला एकदा भेटायला जायला हवं... ! जर माझ्यावर अशी वेळ आली असती तर तर... तर... कुमार नसता का आला... नक्कीच आला असता... !"

स्वतःशीच सुरु असलेला संवाद पूर्णविराम देत तिने संपवला... आणि ती त्याला भेटायला जायचं म्हणून घाईतच तयारी करू लागली... जास्त वेळ वाया न घालता तिने सर्व पटापट आवरून अंगावर होती त्याच कपड्याने सोबत एक हॅन्ड बॅग घेऊन दार बंद केलं... दाराला कुलूप लावलं आणि बस स्थानक जवळच असल्याने ती पायीच बस स्थानकाकडे जायला लागली...

**---- आणि आता भाग २-----**

अनुक्रमणिका : भाग २ :

१३. प्रवास १

१४. तडजोड

१५. मैत्रीचं नातं

१६. प्रवास २

१७. नकळत...

१८. नियतीचा खेळ...

१९. स्मृति

२०. दिलासा

# १३. प्रवास १

ती लगबगीने पावलं उचलत बस स्थानकाच्या दिशेने निघाली... पावलं एकामागे एक जात होती. आजूबाजूला माणसांची गर्दी नव्हती पण मनात कितीतरी प्रश्न गर्दी करत होते... रहदारीचे ठिकाण असल्याने रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार उंच अशोकाची झाडं होती... तर मध्येच काही अंतराने गुलमोहराची झाडं होती... झाडाखाली बसायला जागा म्हणून बाक ठेवलेले... तापत्या उन्हात हे बाक म्हणजे एक सवंगडी... सकाळ संध्याकाळ झाली की तिथं गर्दी असते... तर रोजच्या येण्याजाण्याच्या रस्त्यात येत असल्याने कि काय... या नवीन शहरात आल्यापासून तिला गुलमोहराचं एक वेगळंच आकर्षण वाटतं होतं... तिला मोहून टाकणारी गुलमोहराची झाडं आज वाऱ्यासोबत जणू गप्पा मारत होती... पण आज त्यांच्याकडे साधी एक नजर सुद्धा तिने फिरवली नाही... जवळच गाडीवाल्यांची रोजच्या प्रमाणे देण्याघेण्याची दैनंदिन जीवनातील व्यवहार सुरु होती... पण तिला आज आजूबाजूला काय चाललं याच काहीही भान उरलं नव्हतं... बसस्थानकाच्या आत पोहोचल्यावर तिने चौकशी करून लवकरच बस शोधली. बसवर लावलेली पाटी वाचून ती बसमध्ये चढली आणि खिडकी जवळच्या सीटवर बसली...

बस निघायला अजून काही वेळ बाकी होता... ती खिडकीतून बाहेर प्रवाश्याची गर्दी पाहत होती... प्रत्येकजण आपापल्या बॅग सांभाळीत नातेवाईकांना, मुलाबाळांना सोबत घेत बसमध्ये चढत होते... कुणी परत गावी जात होते तर कुणी

शहरात... काही वेळातच बस सुरु झाली आणि तिच्या प्रवासाला सुरुवात झाली... बसस्थानकमधून बस बाहेर पडली...

उन्ह चांगलंच तापत होत... शहरातून जात असता बस कित्येक गाड्यांना मागं टाकीत सुसाट वेगाने निघाली होती... गाडीतून निघणारे धूर सगळीकडे पसरलेले... वाहनाची कर्कश आवाज ऐकू येत होते... थोडा आवाजाचा त्रास कमी झाला न झाला तोच रस्त्यात येणारे खड्डे पुन्हा एक त्रासाचं निमित्त बनून बसच्या वाटेत तयार होतेच...

काही वेळाने बस शहर मागे टाकून महामार्गाच्या रस्त्याला लागली तसा गाड्यांचा आवाज आणि मध्येच येणाऱ्या खड्ड्यांपासून बसची सुटका झाली...

खिडकीजवळ बसल्याने वाऱ्याची झुळूक हळूच तिला स्पर्शून जात होती... बसमध्ये गर्दी असल्याने घामाने चिंब झालेल्या चेहरा त्या हळुवार वाऱ्याचा स्पर्श हवाहवासा वाटून ती बाहेर पाहू लागली... मनात अनेक विचार गर्दी करू लागले... तेव्हा तिने मागे जाणाऱ्या झाडांना बघितले... तशी काही चित्र तिच्या नजरेसमोर नाचायला लागली  आणि ती त्यांचा पाठलाग करत कधी भूतकाळात पोहोचली... तिला कळलं नाही... कुमार आणि त्याच्या आठवणी ज्यांचा तिला विसर पडला होता...

तिचे डोळे पाणावले... हळूच आसवं पुसून तिने जवळच्या खिडकीत डावा हात आडवा ठेवला... त्यावर हनुवटी ठेवत तिने डोळे मिटले... मनात दाटून आलेल्या आठवणी जणू डोळ्यासमोर येत होत्या... कुमारशी मैत्री झाली तेव्हापासूनच्या काही पुसट आठवणी मनात गर्दी करु लागल्या... आतापर्यंत जाणवणारा थंडगार वारा तिला सोबत गतकाळाकडे भरधाव घेऊन जात अचानक एका क्षणाला थांबला... जीवनाच्या त्या वळणावर ... जिथे या नवीन पर्वाला सुरुवात झाली... कदाचित...?

चार वर्षांआधी जे काय घडलं ते काहीसं आठवत ती परत एकदा त्यादिशेने वाटचाल करीत होती...

कुमारच्या आठवणी मनात नव्याने घर करत होत्या... जीवनातील जे काही क्षण कुमार सोबत असताना तिने अनुभवले... ते एका मागे एक भरभर नजर चुकवत जात होते... तोच तिला तो दिवस आठवला...

पदवीचं दुसरं वर्ष... सोनेरी पहाट उजाळलेली, सूर्यकिरण नभनक्षी करत होते... रोजच्याप्रमाणे ती आजही सर्वकाही लवकर आटोपून कॉलेजला जायला निघाली... पाखरांची किलबिल, सकाळ आणखी रमणीय करत होती... गावापासून मूळ रस्ता गाठायला तिला दहा पंधरा मिनिटे जावं लागत असे... रस्त्याच्या दोन्ही बाजूला हिरवीगार झाडांची वस्ती होती... शेतं शिवार जागी झाली होती...

वाहनांची वर्दळ जरा कमीच... काही पाच दहा मिनिटांच्या अंतराने जड वाहन ये जा करीत होती... वाहने जवळून जात असता, गार वारा अंगावर शहारे भेट देऊन लगेच पुढच्या प्रवासाला निघून जात होता...

काहीच वेळात घर बरेच मागे सोडून ती मुख्य रस्त्याला पोहोचली... सकाळचं ते मनमोहक वातावरण तिच्या मनाला भुरळ घालत होत... ती हळूहळू सायकल चालवत जात असता मागे अचानक  कुणीतरी ट्रिंग ट्रिंग वाजवत असल्याचं तिनं ऐकल... इतक्या सकाळी, त्यात पूर्ण रस्ता मोकळा असून कोण जाणून बुजून छेड काढत असेल... म्हणून तिकडे काहीएक  लक्ष न देता ती घाई घाईत सायकल जरा जोरात चालवायला लागली... तर पाठीमागून येणारी सायकल आणखी जोरात तिचा पाठलाग करत तिच्या बाजूला येऊन ठेपली... आणि दोन्ही सायकली सोबतच जायला लागल्या... तिचं काळीज जरा धडधडू लागलं... पण दुसऱ्या क्षणी आवाज ऐकू येताच तिच्या काळजाचा ठोका चुकला...

" हॅलो, गुड मॉर्निंग... "

आवाज ओळखीचा वाटला तसं तिने फक्त डोळे तेवढे दिसतील अश्या कौशल्याने चेहऱ्याभोवती बांधलेला लांब लचक स्कार्फ मधून हलकेच निश्वास सोडला...

" बावळट... तू आहेस तर... मला वाटलं सकाळी सकाळी कुणी छेड काढत आहे की काय...? किती घाबरले मी...? "

" अरे मी गुड मॉर्निंग म्हणालो तर त्यावर तू चक्क मला बावळट म्हणतेस... घाबरल्याचं सांगतेस... " तो हसतच म्हणाला...

" खरंच मी खूप घाबरले... तुला आवाज द्यायला काय झालं होतं... " जरा नाराज होऊन ती म्हणाली.

" पण इतकं घाबरायला झालं तरी काय? जरा मस्ती म्हणून वाजवली ट्रिंग ट्रिंग... " पुन्हा हसतच

" तुला सकाळ झाली वाटते मस्ती करायला... नाही...? "

" बरं सॉरी... " तो म्हणाला.

" हा हे बाकी छान... सॉरी म्हटलं की मोकळं व्हायचं... "

तिच्या स्वरात असलेली नाराजी डोळ्यातून दिसत होती...

थोडावेळ असाच निघून गेला... दोघेही काही वेळ गप्पच... सायकली कॉलेजच्या दिशेने चालवत दोघेही समोर जात होते...

" बरं एकदा आणखी सॉरी... प्लिज मला माफ कर... " पुन्हा त्यानेच पुढाकार घेतला...

" ओके पण पुन्हा अशी मस्करी नको... मला नाही आवडणार... "

" हो पुन्हा नाही चूक होणार अशी... "

दोघेही कॉलेजला पोहोचले... सायकल बाजूला लावून आपापल्या वर्गात गेले... तर अजून बरेच विद्यार्थी यायचे बाकी होते... थोड्याच वेळात वर्गात लेक्चर्सला सुरुवात झाली... लागोपाठ सर्व लेक्चर्स होत मधली बेल वाजली... सर्व विद्यार्थी कॉलेजच्या परिसरात वावरत गप्पा मारीत बसलेले... डबा जेवत बसलेले... तर कुणी वर्गातच उरलं सुरलं गृहपाठ करीत असता पुन्हा बेल वाजली... मधल्या सुट्टी नंतरच्या लेक्चर्स ला एकदा नव्याने सुरुवात झाली... दुपारचे बारा वाजले... तोच सुटी झाली असं जाहीर करत बेल वाजली... तशी जल्लोष करत काही तरुण मंडळी भराभर बॅग उचलून बाहेर पडली...

तिने सायकल वर बॅग ठेवून चावी आणि स्कार्फ बाहेर काढला... चावी लावून सायकलचे कुलूप उघडलं... बॅग सायकलच्या हॅन्डलला बसवलेल्या पिंजऱ्यात ठेवून स्कार्फ बांधून घेतला... आणि घरी जायला निघाली...

कॉलेजच्या बाहेर जाणाऱ्या आणि नेमक्या त्याच वेळी दुपारी ज्युनियर कॉलेजचे लेक्चर्स असल्याने आत येणाऱ्या विद्यार्थांच्या गर्दीतून सायकल समोर घेत ती घरी जायला निघाली... कॉलेजच्या गेटजवळ खूप गर्दी झाली होती... ती गर्दीतून वाट काढून मूळ रस्त्यावर आली... दुपारची वेळ असल्याने रस्ता जणू वाहनाची जत्रा आहे की काय असा भासत होता... ती हळू हळू सायकल चालवत होती...

तितक्यात एक सायकल मागून येऊन तिच्या बाजूलाच हळूच ब्रेक लावत...

" हॅलो... "

तिला कळलं की नेमका तोच असला पाहिजे म्हणून बाजूला मान वळवून...

" हॅलो... बोल... "

" बोलू ना सोबतच चाललो आपण... हे घे आधी... " म्हणत त्याने एका हाताने सायकल पकडत दुसऱ्या हाताने चॉकलेट पुढे केले...

" चॉकलेट...? आज वाढदिवस आहे तुझा...? " तिने चॉकलेट न घेता आधी प्रश्न विचारला...

" वाढदिवस वगैरे काही नाही, बस सहज... " तो उत्तरला... अजून चॉकलेट त्याच्याच हाती होते

" सहज म्हणजे...? " पुन्हा तिचा प्रश्न।

" अरे चॉकलेट द्यायला निमित्त पाहिजे काय...? इतके प्रश्न... घे आता लवकर... मित्र आहोत ना आपण ! मग मी वाढदिवस असेल तरच तुला काही द्यायला हवं...? " तो म्हणाला...

ती चॉकलेट हाती घेत...

" तसं नाही पण... "

त्याने मध्येच तिचं बोलणं थांबवून...

" बस आता... चॉकलेट खाऊन घे आधी नाहीतर वितळून खराब होईल ते... " म्हणत त्याने खिश्यातून दुसरं चॉकलेट काढलं आणि तो खाऊ लागला

तिने स्कार्फ सोडून त्याचा डोळयाखाली बांधलेला भाग बाजूला केला... चॉकलेट दाताने उघडून, एक लहान तुकडा तोडत... " अरे वा किती मस्त आहे हे चॉकलेट... "

" आवडलं तुला... " तिच्याकडे क्षणभर टक लावून पाहत तो म्हणाला...

" हो खूपचं चवदार... पण तू आज अचानक कसं काय मला दिलं ते कळलं नाही. "

" म्हटलं तर कारण आहे आणि नाहीसुद्धा... "

" म्हणजे...? काही कळेल असं सांग कोडं नको... आधीच आज खूप गृहपाठ दिला आहे... सरांनी... त्यात तुझ्या कोड्याची भर नको... "

" सकाळी सकाळी आज तुला त्रास झाला ना माझ्यामुळे म्हणून आणि... "

" अरे ते काय ते तर मी केव्हाच विसरले... त्यात काय एवढं आजची मैत्री आहे काय आपली... अजून काय म्हणत होता...? "

जरावेळ थांबून तो म्हणाला... " एक काम आहे माझं... जे तुला करायचं आहे... "

" तुझं कोणतं काम...? आणि मी कस काय करणार... बरं ते जाऊ दे आधी सांग काय काम आहे... बाकीचं नंतर बघू... "

पुन्हा जरावेळ शांत राहून...

" तू करणार कि नाही ते सांग आधी... चार वर्ष्यापासूनची आपली मैत्री आहे ना... " त्यानं पुन्हा तिला कोड्यात टाकलं...

आता थोडा विचार करत ती खूप हळू हळू सायकल चालवत... " ठीक आहे मी तुझं काम करणार... बोल काय करायचं आहे...? "

" अरे वा... निम्म काम तर झालंच तू होकार दिल्याबरोबर... ! तसं तुला काम वगैरे काही करावं नाही लागणार माझी मदत करावी लागेल जरा... "

" माझी मदत हवी तुला...? काहीपण तीन वर्ष्यापासून सारखा टॉपर येणारा तू... तुला काय मदतीची गरज पडली...? "

" आता आली वेळ मदत मागायची, तू करणार ना? "

" हो नक्की ! तू कितीदा माझी मदत करतोस मग मी का नाही करणार...? बरं सांग काय मदत करू शकते मी? "

बराच वेळ शांत राहून -

" मला काही सांगाचंय... "

" बोल ना, पुन्हा मध्येच का बरं थांबला? "

" हे बघ... मला ना हि गोष्ट तुला खूप दिवसापासून सांगायची होती... पण कसं सांगू कळत नव्हतं तू मला समजून घेशील कि नाही हाही एक प्रश्न सतावत होता... मला... मला ना... "

" अरे पुढं काही बोलणार आहेस का तु...? तुला काहीतरी सांगाचंय ! इतकंच कळलं फक्त... "

" एक आहे कुणीतरी... मला खूप आवडते पण तिला सांगु कि नको हे कळतं नाही आणि सांगावं म्हटलं तर काय करावे काही सुचत नाही... "

" काय...? म्हणजे तू कोणाच्यातरी प्रेमात तर पडला नाही ना...? " ती हसतच त्याची मस्करी करत म्हणाली...

" मला नाही माहित प्रेम आहे की नाही ते... मला फक्त इतकं माहित आहे की ती मला आवडते... "

मध्येच त्याला थांबवत...

" ये सांग ना. कोण आहे ती...? नाव काय आहे तिचं...? प्लिज... प्लिज ।" अतिउत्साहात

" थांब जरा आधी माझी मदत कर, मी काय करू ते सांग? तिला हे सांगू कि नाही...? कि मला ती आवडते... "

जरावेळ आणखी विचार करत...

" हो सांगून टाक तिला... पण नाव सांग मला तिचं... मी पाहिलं आहे का तिला...? "

" खरंच सांगू तिला...? तिला वाईट तर नाही ना वाटणार...? तुला काय वाटते काय म्हणेल ती...? "

" हो रे, बिनधास्त सांगून टाक... बरं मला काही सांगशील नाव काय.? कोण आहे वगैरे...? "

" नाव नाही सांगत आत्ताच... पण काही गोष्टी सांगतो तिच्याबद्दल ज्यावरून तूच ओळखशील कि ती कोण आहे... "

" काय हे पुन्हा कोडंच का...? बरं सांग. "

" पहिलं कि खूप सुंदर आहे... इतकी सुंदर कि मी शब्दात सांगू शकत नाही... "

" हं स्तुती पुरे, आता कामाचं सांग आधी नाव तर सांगणार नाही म्हणे खूप सुंदर आहे अप्सराच जणू... "

सांगतो ऐक, पण तुला माझी मदत करावी लागेल...

" मला ती आवडते हे तुलाच तिला सांगायचं आहे... माझी ती मैत्रीणच आहे आणि माझ्यापेक्षा जास्त तू तिला ओळखते... रोज नाही दिसत इतक्यात पण नेमकं मला घाई गडबड असते तेव्हा भेटतेच... ती दिसली नाही ना तर मन बेचैन होऊन जाते अन ती समोर असतांना मन कसं प्रसन्न होऊन जाते... जरा तिचा विसर पडला की नजरे समोर हजर... आणि मग फक्त तिचाच चेहरा दिवसभर मनात घर करून असतो... सर्वात महत्वाच असं की तुझ्याशिवाय कुणीही यात माझी मदत करू शकत नाही कारण तूच केवळ तिला हे सांगू शकते... "

" बरं कळलं किती आवडते ती तुला पण मी कशी मदत करणार तुझी, जोपर्यंत तू मला तिचं नाव सांगणार नाही? "

" मी नाव नाही सांगणार आहे. तुला शोधायचं आहे की ती कोण आहे तुला आतापर्यंत जे काय सांगितलं त्यावरून, शिवाय तू तिला ओळखते... आणखी एक खूण अशी की ती आपल्याच कॉलेजमध्ये आहे... "

इतक्यात मध्येच बसचालकाने बसला ब्रेक लावला आणि अचानक झटका बसल्याने तिला जाग आली... तिने डोळे उघडून आजूबाजूला पाहिले... ती भानावर आली, क्षणात तिला कुमार ला भेटायला जात असल्याचं लक्षात आलं... बॅगमधून मोबाईल बाहेर काढून तिने किती वाजले ते पाहीले... तिच्या मागच्या सीटवर बसलेले गृहस्थ मोबाईल वरून बोलत असल्याचं तिने ऐकलं...

"हॅलो, बसमध्येच आहे. अजून १० - १५ मिनिटं लागतील बस स्थानकाजवळ यायला, पोहोचलो कि फोन करतो हं। बरं ठेऊ मग आता...? ठेवतो..."

# १४. तडजोड

कुमारचे आई - वडील, आकाश आणि सुजितचे वडील गावाला पोहोचले. ते कुठेही न थांबता सरळ घरी आले. अंगण कसं रखरखं झालं होतं... ते दुचाकीहून खाली उतरताच घरासमोर शेजाऱ्यांची गर्दी जमली... आकाशने घराच्या कुलुपाची चावी घेऊन दरवाजा उघडला... जे काही लोक, कुमारला रात्री भेटायला जाऊ शकले नाही... ते तब्येत आता कशी आहे ते विचारण्या त्याच्या अंगणात जमले होते... सर्व कुमार कसा आहे...? हाच एक प्रश्न विचारत होते... वारंवार कुमारचं नाव आणि त्याची विचारणा ऐकून ती माउली व्याकुळ झाली आणि घरात न जाता ... डोळयात जमा झालेल्या आसवांना वाट मोकळी करून देत... दाराच्या पायरीवर बसली.

ती माउली कशीतरी शोक आवरता घेत कुमार अजून बेशुद्ध असल्याचं सांगत होती. शेजारी त्यांना धीर देत त्यांचा मुलगा लवकर बरा होवो असं मनोमन देवाकडे मागत निरोप घेत होते. गर्दी हळूहळू कमी झाली. सर्व कुमारची विचारपूस करून आप आपल्या घरी जायला लागले...

शेवटी वास्तव इतकेच, आपल्या वाटेतील अडथळयांना आपण स्वतःच सामोरं जावं लागतं. जीवनात येणाऱ्या अडचणी, वाईट परिस्थिती असो वा कोणतेही संकट यांचा सामना स्वतःच करावा लागतो. लोक काय तर दिलासा आणि सल्ला देतात, बाकी जे काय करायचे ते स्वतः च करावे लागते...

आकाश आणि सुजितचे वडील सर्व लोक घरी गेल्यावर त्यांना धीर देत घरात घेऊन गेले. आकाशने सर्वांना पाणी दिले. ती माउली जरा आसवं पुसून खाली

बसली. थोडावेळ तिथे नीरव शांतता पसरली होती. बराच वेळ कुणी काहीच बोललं नाही...

रात्रभर दवाखान्यात राहिल्याने आकाश वास्तव जाणत होता तेव्हा न राहवून...

" काका, काकू तुम्ही काळजी करू नका लवकर बरा होईल कुमारदादा । ऑपरेशन झालं ना कि सगळं ठीक होईल " आकाश धीर देत म्हणाला.

आकाशला पाणावलेल्या डोळयांनी त्या दोघांनी प्रतिसाद दिला. तसेच त्यांना ऑपरेशन करिता आवश्यक ती तयारी करायला हवी याची जाणीव झाली.

" बरं काका मी घरी जातो आणि आंघोळ वगैरे आटपून लगेच परत येतो. " असं म्हणत आकाश घरी जायला निघाला.

" आपण ऑपरेशन साठी पैश्याचा बंदोबस्त करायला पाहिजे... " सुजितचे वडील म्हणाले.

तशी चिंतेची लहर त्या दाम्पत्यांच्या चेहऱ्यावर उमटली. घरची परिस्थिती लक्षात घेता इतकी मोठी रक्कम जमा करणं हे त्यांच्यासाठी एक आव्हान होतं. घरी शेती नाही की कुणाची रोजची कमाई होईल असं काही साधन नाही. म्हणून जे काय कमवावं ते घर चालवण्यास पुरेसं इतकंच होत. त्यामुळे शिल्लक काही राहत नव्हतं पण कुमार खाजगी नोकरीला लागला तसं देणं देऊन आवक थोडी वाढली होती. सर्व गोष्टी जरा सुधारत होत्या तोच नियतीनं त्यांचं जीवन पूर्ववत करायचं ठरवलं होतं

की काय...? हा समय त्यांच्यावर ओढवला. काय करावं कि सर्व ठीक होईल...? हाच सवाल त्यांना पडला होता...

बराच वेळ विचारचक्र त्यांच्या मनात फिरत होते. ते विचारचक्र थांबवत सुजितचे वडील म्हणाले...

" आपल्याला पूर्ण रक्कम लगेच जमा नाही करावी लागणार. काही रुपये ऑपरेशन करण्याआधी आणि बाकीचे ऑपरेशन झाल्यावर द्यायचे आहे. तेव्हा पैश्याची काळजी नका करू आत्ताच... "

" घरी निदान पंधरा हजार रुपये तरी असतील. " पदराने आसवं पुसत ती म्हणाली.

" आणखी पाच हजार जमवता येतील. " स्वतःला सावरत कुमारचे वडील म्हणाले.

" म्हणजे वीस हजार रुपये आज आपण जमा करू शकतो. ठीक आहे ना, ऑपरेशन होण्याअगोदर इतकी रक्कम पुरेशी आहे. " सुजितचे वडील म्हणाले.

" पैसा मोलाचा नाही आज, आमचा कुमार तितका बरा होऊ दे परमेश्वरा! कुमार बरा झाला कि मिळालं समदं! आम्हाला बाकी काही नको. " कुमारची आई त्या दोघांच्या मनातलं बोलली.

" जरा सांभाळा एकमेकांना, आवरा जे काय करायचं ते, आपल्याला जायला हवं लवकर परत दवाखान्यात... " सुजितचे वडील म्हणाले.

त्यावर त्या दोघांनी नुसता मानेनं होकार दिला.

" बरं, मी निघतो , तयार लगेच होऊन परत  येतो . तुम्ही आटोपून घ्या. आपल्याला घाई करायला हवी... " म्हणत सुजितचे वडील घरी जायला निघाले.

सुजीतच्या वडिलांना जाऊन बराच वेळ झाला तरी ते दोघे अजून तसेच बसून होते. काय करावं? कसं करावं? त्यांना काही सुचत नव्हतं. कुमार म्हणजे त्यांचा धीर, तोच त्यांची हिंमत, त्यांचा आधार ! त्याला त्या अवस्थेत बघून ते दोघेही पार खचून गेले होते... आयुष्यात संकटांना तोंड द्यावं लागलं नाही असं नाही. गरिबी, बेकारी, उपासमार, दुष्काळ, आजार हे त्यांनी सोसलं होत... पण मुलगा आज बरोबरीचा झाला आणि नियतीनं म्हणा कि नशिबानं म्हणा त्यांना या वेळी जीवनाच्या या वळणावर आणून उभं केलं जे त्यांनी कधी स्वप्नातही पाहिलं नव्हतं...

काही वेळाने स्वतःला सावरत ते दोघेही उठले. तिने कपाट उघडून आतला कप्पा चावीने उघडला. जे काय जमा असलेले पैसे  होते ते बाहेर काढले... कुमारच्या वडिलांना देत...

" एकदा मोजून घ्या किती आहे ते... पंधरा हजार असायला पाहिजे... "

" पंधरा हजार तीनशे रुपये आहेत... "

" तुम्ही आणखी पाच हजार जमतील म्हणालात... पण कसे...? कुणाकडून घ्यायचे आहे का? "

" हो, घ्यायचे ठरवले... सोनाराकडून, दागिना ठेवू म्हणत होतो... ५००० ला... काहीतरी तडजोड केली पाहिजे... "

त्यावर तिने त्याच कप्प्यात ठेवलेली लाल डबी बाहेर काढून त्यांच्या पुढे केली... कोणताही सवाल जवाब न करता... डबी हातात देतेवेळी तिच्या पापण्या ओलावल्या... आसवं पदराने पुसत ती म्हणाली...

" गेल्या दिवाळीला  कुमारने मला भेट आणले हे कानातले... "

क्षणभर दोघेही ती दिवाळी आठवून तसेच उभे राहिले... किती उत्साहाने कुमारने सर्वांसाठी कपडे आणले होते... आठवडाभर घर कसं चमचम करत होतं त्यांनच घर रंगवून छान सजवलं होतं...

पण आज  काही वेगळंच चित्र त्याच्या जीवनात नशिबानं रेखाटलं होतं... एका क्षणात सारं काही बदललं... नियतीनं घात केला...

मग तिने आवराआवर करायला सुरुवात केली. काल घरून गेल्यापासून सगळं जिथल्या तिथं होतं. जेवायची मुळीच इच्छा नव्हती पण दवाखान्यात कुमारजवळ प्रशांत, आकाशचे वडील, सुजित असल्याने त्यांच्यासाठी डबा घ्यायचा म्हणून तिने स्वयंपाक केला. वेळ कोणतीही असो रोजची काम जी आहेत ती करावीच लागतात...

थोडा वेळ झाला न झाला तोच आकाश तयार होऊन आला. दुचाकी बाजूला लावून त्याने दाराबाहेर चप्पल काढून ठेवली... घरात जात...

" काका, काकू... " त्याने आवाज दिला...

" आला का आकाश? " कुमारची आई...

" हो काकू, काका कुठे आहेत? " आकाश...

इतक्यात पैसे खिश्यात ठेवत कुमारचे वडील आतल्या खोलीतुन बाहेर आले... बाहेर दुचाकी थांबल्याचा आवाज ऐकू आला... कोण आलं ते पाहायला आकाश आणि कुमारचे वडील बाहेर पडले तर सुजितचे वडील दुचाकी स्टँडवर लावत होते... दुचाकी उभी करून ते आत यायला लागले तर समोर त्या दोघांना घराबाहेर आलेले पाहताच...

" आटोपलं सगळं... निघायचं का...? " सुजितचे वडील

त्यावर मानेनं होकर देत कुमारचे वडील चप्पल पायात घालून त्यांच्याजवळ जाऊन म्हणाले... "हो झालं सगळं बस निघूया, जातेवेळी एक काम करायचं बाकी आहे. मी वाटेत सांगतो तुम्हाला काय ते... "

कुमारचे वडील म्हणाले...

" बरं ठीक आहे, चला मग " सुजितचे वडील

दवाखान्यात जावं लागेल त्याआधी देवघरात जाऊन तिने देवापुढे दिवा लावला, हात जोडून कुमारला लवकर बरा होऊ दे, म्हणत देवाला नमस्कार केला. सोबत डबा घेऊन ती बाहेर आली. तिने दार बंद करून कुलूप लावलं...

" पिशवीत काय आहे त्या...? डबा घेतला का...? " सुजितचे वडील

" हो. ते तिघे सकाळपासून तसेच आहेत  तिथं म्हणून घेतला " ती मायेच्या स्वरात म्हणाली...

" तुम्ही कश्याला त्रास करून घेतलात मी आणला डबा त्यांच्यासाठी... बरं असू द्या चला जाऊ आता... " सुजितचे वडील

वेळ वाया न घालता ते घरून निघाले...

वाटेत जात असता कुमारच्या वडिलांनी सोनाराकडे जायचं आहे म्हणून त्यांना सांगितले... मग शहरात आल्यावर ते सोनाराकडे गेले. तिथून पैसे घेऊन ते पुढच्या रस्त्याला लागले...

## १५. मैत्रीचं नातं...

इकडे जिल्हा रुग्णालयात...

प्रशांत आई वडिलांची वाट पाहत होता. त्याला भावाची झालेली अवस्था बघवत नव्हती तरी तो 5-5 मिनिटांनी ICU च्या त्या गोलाकार काचेतून कुमारला जाग आली की नाही ते पाहत होता. प्रत्येक वेळी तो निराश होऊन दाराजवळून परत येत होता... खरं तर त्याचं मन मानायला तयार नव्हत कि कुमारचा अपघात झाला आहे. कुमार स्वतः इतरांना वाहन हळू चालव म्हणून बजावत होता आणि स्वतः जबाबदारीनं दुचाकी हळूच चालवायचा. मग असं अचानक कसं काय होऊ शकतं? हा प्रश्न त्याला बेचैन करीत होता... का म्हणून असं व्हावं? का दादाच्या नशिबी हा अपघात यावा? का असं अनपेक्षित घडावं? असे अनेक विचार मनात घोळत असता त्याने डोळे मिटून बाकाला पाठ टेकवली...

आकाशचे वडील अधूनमधून कुमारला तपासायला येणाऱ्या प्रत्येक नर्स आणि डॉक्टरला विचारपूस करत होते. कसा आहे आता कुमार? काही सुधार आहे का  त्याच्या तब्येतीत? शुद्धीवर आला का तो? आकाश आणि प्रशांत हे बालपणीचे मित्र, त्यामुळे एकमेकांच्या घरी ये जा सुरूच असल्याने कुमार त्यांना मुलासमान वाटायचा... असा अचानक त्याचा अपघात झाला याचा धक्का त्यांनाही बसला...

या सर्वांपेक्षा सर्वाधिक विचारात कुणी होतं तर तो म्हणजे सुजित, त्याला कारण ही तसंच होतं... पहिलं म्हणजे कुमारचा असा अनपेक्षित अपघात ज्याची तो कल्पनाही करू शकत नव्हता कि कुमारचा कधी अपघात होईल... बऱ्याचवेळा दोघे मिळून फिरायला जायचे पण कधी गंम्मत म्हणून सुद्धा कुमारने जोरात दुचाकी चालवली असं कधीच झालं नाही...

दुसरं म्हणजे कुमारची डायरी... त्यामुळे सुजितला जरा जास्त धक्का बसला होता. कितीतरी दिवसापासून मित्र असून त्याला हे गुपित माहित नव्हतं आणि भलत्याच वेळी ती डायरी नजरेस पडली... तो आज या अवस्थेत आहे त्यामुळेच हे सगळं माहित झालं. त्याचा अपघात झाला हे चांगलं झालं की वाईट? काय म्हणावं याला, इतके दिवस लपवून ठेवलेलं रहस्य या अश्यावेळी कळावं याचा अर्थ काय? नियतीचा काय लपंडाव चाललाय कुणास ठाऊक...?

स्वतःशीच पुटपुटत तो बाहेर पायरीवर बसून होता...

विचारात मग्न असतांना त्याचा मोबाईल वाजला. त्याने मोबाईल खिश्यातून बाहेर काढला. मोबाईलच्या स्क्रीनवर, आर्यन नावाने कुमारच्या सिमवर Incoming call दिसला. कुमारच्या खास मित्रांपैकीच एक - आर्यन, सुजित त्याला ओळखत होता. त्याने कॉल घेऊन...

" हॅलो... "

" हॅलो कुमार... अरे तु कुठे आहेस? काल रात्री किती तुला वेळा फोन केला पण तुझा मोबाईल नंबर बंद आहे असंच उत्तर मला मिळालं ... "

" हॅलो... मी... " पुढे सुजित काही बोलणार तोच तिकडून मध्येच आवाज आला... सुजित ऐकू लागला.

" तुला वेळ आहे का जरा, तुझ्याशी महत्वाचं बोलायचं आहे, मला तुला काही सांगाचंय... " आर्यन घाईतच बोलला.

" हॅलो प्लिज थांब आर्यन, मी सुजित बोलतोय... "

" कोण? सुजित... हं ओळखलं, अरे कुमारला दे ना जरा मोबाईल मला त्याच्याशी खूप महत्त्वाचं काम आहे... प्लिज... प्लिज जरा लवकर "

" आर्यन, कुमार... कुमार... " सुजित ला गहिवरून आलं पुढे त्याला बोलवत नव्हतं.

" कुमार नाही का तिथे? आल्यावर प्लिज मी कॉल केला होता म्हणून सांग त्याला... आठवणीने नक्की सांगशील " तिकडून होकार मिळण्याची वाट बघत तो म्हणाला.

" अरे, कुमारचा काल अपघात झाला. "

" काय? काय म्हणाला तू सुजित? कुमारचा अपघात? कधी? केव्हा? कुठे? आणि कसा? "

मग सुजितने थोडक्यात त्याला सांगितलं की अपघात कधी आणि कसा झाला, कालपासून कुमार अजून बेशुद्ध आहे. कुमारचं ऑपरेशन होणार... जमलं तर तू ये...

" जमलं तर ! काय म्हणतोस तू सुजित अरे कुमार बेस्ट फ्रेंड आहे माझा... निघालोच मी तिथं पोहोचल्यावर तुला कॉल करतो... "

" बरं ये मी वाट बघतो "

" काळजी करू नकोस काही होणार नाही त्याला, अरे इतरांना जगणं शिकवणारा कुमार, नेहमी मदत करणारा... सर्वांना समजून घेणारा... त्याच वाईट कसं रे होणार... चल ठेवतो मी, लवकरच भेटू... "

" हो आल्यावर मला कॉल कर " सुजित म्हणाला.

आर्यन सोबत बोलून त्यालाही जरा मन हलकं झाल्यासारखं वाटलं. कुमारला खरंच खूप जिवाभावाचा मित्र मिळाला असं मनात आलं आणि त्याला अनिरुद्ध ची आठवण झाली. अनिरुद्ध म्हणजे कुमारचा बालपणीचा मित्र, अगदी लहान असताना ते मित्र बनले. कुमार बऱ्याच वेळेस त्याची आठवण काढायचा, मग लहानपणी केलेल्या गमती सांगायचा. तो बालपणीचे किस्से सांगायला लागला कि खूप खुश व्हायचा... सुजित या विचारात हरवला... काही वेळानंतर त्याला जाणवलं की कुमारबद्दल अनिरुद्धला सांगायला हवं... त्याने कुमारच्या सिमकार्डमधील कॉन्टॅक्ट लिस्टमधून अनिरुद्धचा मोबाईल नंबर शोधून काढला आणि घाईघाईत त्याच सिमवरून डायल केला...

" हॅलो कुमार... 100 वर्षे आयुष्य आहे बघ तुला, तुझाच विचार करत होतो आणि तुला फोन करणार होतोच तर तुझाच कॉल आला. "

सुजित मनातल्या मनात, अरे यार चुकून कुमारच्या सिमवरून कॉल लागला... अन काहीसं पुटपुटला...

" हॅलो... हॅलो अरे आवाज येत नाही काय म्हणाला? "

" मी सुजित बोलत आहे. ओळखलं का? "

" सुजित? हा ओळखलं. पण कुमार कुठे आहे? "

" तो... तो... दवाखान्यात आहे. "

" काय झालं त्याला? कुमार ठीक तर आहे ना? "

" कुमारचा अपघात झाला काल. "

" कसा झाला अपघात? कुमार कसा आहे? कुठं आहे तो आता? "

पुन्हा सुजितने थोडक्यात त्याला सांगितलं...

" मला कालपासून कुमारची आठवण येत होती. काल रात्री मी त्याला फोनसुद्धा केला होता पण त्याचा मोबाईल नंबर लागतच नव्हता... "

" अपघातात त्याचा मोबाईल पण फुटला, आज सकाळी मी त्याचं सिमकार्ड माझ्या मोबाईल मध्ये टाकलं... "

" धन्यवाद मला तु सांगितलं त्याबद्दल. बरं मी फोन ठेवतो आणि बस लगेच निघतो, तिथं आलो की तुला कॉल करतो... "

" ठीक आहे. बाकी तू इथं आल्यावर बोलू... "

" हो चल ठेवतो फोन... "

असं म्हणत दोघांनी फोन कट केला... एका क्षणाला त्याच्या मनात विचार आला... मैत्रीचं नातं किती निराळं असत ना अगदी काहीएक संबंध नसतांना फक्त

काही दिवसांच्या ओळखी, संपर्क येऊन कुणा अनोळखी व्यक्ती सोबत आवडी निवडी जुळतात. नकळत एका नवीन नात्याचा जन्म होतो. कधीकाळी आम्ही एकमेकांना ओळखत नव्हतो तर साधी ओळख नव्हती आणि कुमारशी मैत्री झाली तशी आर्यन, अनिरुद्ध यांच्याशी ओळख झाली... मैत्रीचं नातं कसं जुळलं ते कळलं नाही... अनिरुद्ध तर कुमारचा बालपणापासून मित्र आहे, मग त्याला तरी त्या डायरी बद्दल नक्की माहित असेल... कदाचित तिच्याबद्दल सुद्धा...

खाली पायाकडे पाहत तो विचार करत पायरीवर बसला असता... कुणीतरी त्याच्या पाठीवर हात ठेवल्याचं जाणवलं तसं त्याने मान वर करून वर पाहिलं तर त्याचे वडील, आकाश आणि कुमारचे आई वडील तिथं आल्याचं त्याला दिसलं...

" बाबा, कधी आलात तुम्ही  सगळे? "

" आत्ताच आलो आम्ही. तू इथं बाहेर काय करत आहे? "

त्यावर " काही नाही. सहजच... " असं उत्तर त्याने दिलं.

" कुमार कसा आहे आता? जागा झाला की नाही अजून? " मध्येच तिने विचारले

" काकू, अजून बेशुद्धच आहे तो. " सुजित म्हणाला.

" चला आत जाऊया " सुजितचे वडील म्हणाले

मग सगळे सोबतच पायऱ्या चढून सरळ ICU कडे गेले. कुमार कसा आहे ते पाहायला... दुरूनच आकाशचे वडील तिथेच दाराच्या काचेतून त्याला पाहत

असल्याचं त्यांना दिसून आलं... काही क्षणात तेही दाराजवळ पोहोचले... निदान ऑपरेशन करण्या पूर्वी तरी तो शुद्धीवर यावा या आशेने एकदा कुमारला मनभरून तिने पाहिले... तिचे डोळे भरून आले अन आसवं गालावरून खाली ओघळले... ती अनावर होऊन जास्त भावूक होत होती मग तिला सावरत त्यांनी बाकावर बसविले. प्रशांत तिच्या जवळ बसून तिला धीर देत होता... आकाश आणि सुजित बाजूलाच उभे राहून प्रशांतला मदत करत होते...

कुमारचे वडील दाराच्या काचेतून त्याला पाहत होते... एक नजर त्या माउलीला पाहून त्यांच मन भरून आलं पण त्यांनी स्वतःला सांभाळलं... त्यांना ठाऊक होतं की असं खचून कसं निभवणार, वास्तविकता मान्य करून त्यावर मात करणे हाच एकमेव उपाय आणि जीवन जगत असता हेच सूत्र योग्य आहे... मागे वळून पाहिलं तर आकाशचे वडील बाजूलाच त्यांच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाले...

" सगळं ठीक होईल. तुम्ही मुळीच चिंता करू नका "

डोळयात आलेले पाणी दिसू न देता त्यांनी मानेनं प्रतिसाद दिला...

" तुम्ही यायच्या आधी डॉक्टर त्याला तपासून गेले. तुम्हाला परत आल्या नंतर केबिनमध्ये येऊन भेटायचं हा निरोप दिला होता... " आकाशचे वडील म्हणाले.

स्वतःला सावरत " का? कश्यासाठी केबिनमध्ये भेटायचं डॉक्टरांना? "

" ते नाही सांगितलं, पण काहीतरी बोलायचं आहे असं डॉक्टर म्हणाले. "

" चला तर मग डॉक्टरांना भेटून घेऊ "

आतापर्यंत हे सारं बोलणं ऐकत बाजूलाच उभे सुजितचे वडील म्हणाले...

तिघे डॉक्टरला भेटायचं म्हणून केबिनच्या बाहेर थांबून...

" डॉक्टर साहेब आम्ही आत येऊ का? " परवानगी घेत त्यांनी केबिनचं दार हळूच आत लोटलं.

" हो. प्लिज तुम्ही आत या. " डॉक्टर ने परवानगी देत त्यांना आत बोलावलं...

तिघेही आत येऊन डॉक्टरांच्या टेबल समोर उभे राहिले...

" तुम्ही उभे का? प्लिज खुर्चीवर बसा "

तिघेही डॉक्टर आता काय म्हणणार आहे या विचारातच खुर्चीवर बसले...

" डॉक्टर, तुम्ही काहितरी बोलायचं आहे म्हणालात? " सुजीतच्या वडिलांनी पुढाकार घेत विचारले.

" हो मला तुम्हाला काही सांगायचं आहे "

" काय झालं डॉक्टर? कुमार बरा होईल ना? " कुमारचे वडील काळजीनं म्हणाले

" ऑपरेशन झालं की तो नक्की बरा होणार. आवश्यक ते सर्व रिपोर्ट आलेले आहेत सगळं नॉर्मल आहे, आपण त्याच ऑपरेशन करू शकतो... " एवढं बोलून डॉक्टर थांबले.

जरावेळ समाधानाने तिघे एकमेकांकडे पाहत...

" मग आता बाकी काय आहे? " आकाशच्या वडिलांनी विचारलं

एक नजर कुमारच्या वडिलांकडे पाहून... " आपण इथेही कुमारचं ऑपरेशन करू शकतो पण याठिकाणी काही गोष्टींची उणीव आहे तर वेळेवर कोणत्या प्रकारची इमर्जन्सी आल्यास अडचण निर्माण होऊ शकते म्हणून मी तुम्हाला एक सुचवू का? "

जरा चिंतेचा विषय होता पण जरा वेळ विचार करून ते म्हणाले...

" बोला डॉक्टर साहेब काय म्हणणं आहे तुमचं "

" माझं मत असं आहे की कुमारचं ऑपरेशन खाजगी दवाखान्यात करायला हवं. तिथं त्याची पूर्ण सोय केली जाईल कोणतीही इमर्जन्सी असो किंवा इतर काही अडचणी आल्या तरी सगळ्या सुविधा उपलब्ध असणार... "

आता चिंता आणखी वाढली कारण पहिली गोष्ट अशी की कुमारला शुद्ध नव्हती त्यात दुसऱ्या दवाखान्यात हलवणं... दुसरी गोष्ट म्हणजे खाजगी दवाखाना म्हटलं की खर्च जास्त येईल...

आता काय करावं त्यांना काहीएक सुचत नव्हतं... जरावेळ शांतता पसरली...

" तुम्ही जास्त विचार करू नका माझ्या मित्राचाच उत्तम दवाखाना आहे, डॉक्टर देवांश वैद्य त्याच नाव शिवाय मी त्याच्याशी कुमारच्या ऑपरेशन बद्दल आधीच बोललो आहे... मी बरोबर असेलच कि ऑपरेशन करतेवेळी आणि तुम्ही पैश्याची काळजी करू नका मी तुम्हाला आधी जितका खर्च सांगितला होता तेवढाच येईल... "

हे ऐकून त्यांना बरं वाटलं... चेहऱ्यावर आलेली चिंतेची छाया हळूहळू नाहीशी झाली...

"ठीक आहे डॉक्टर साहेब मला तुमचं म्हणणं पटलं " कुमारचे वडील म्हणाले

" हा फॉर्म भरून घ्या आणि येथून जाण्याची तयारी करा, मदतीला आपली रुग्णवाहीका असेलच... "

त्यावर होकार मिळताच...

डॉक्टर खुर्चीवरून उठून त्यांच्या बाजूला येऊन उभे राहिले आणि खांद्यावर हात ठेवून...

" ठीक आहे. आणखी काही मदत लागली तर मी आहेच... काळजी करू नका. ओके... "

असा संवाद संपताच ते सर्व केबिनबाहेर पडले... मग ते तिन्ही वडील मंडळी ICU जवळ आले... डॉक्टर जे म्हणाले ते सर्व कुमारच्या आईला आणि त्या तिघांना सांगितले...

सुजित फॉर्म हाती घेऊन वाचू लागला... त्यात रुग्णाचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, वॉर्ड क्रमांक, आजार इतर काही गोष्टी अशी काही माहिती भरावयाची होती तर दुसऱ्या पानावर, स्वतःच्या मर्जीने, जबाबदारीने रुग्णाला दुसऱ्या दवाखान्यात हलवण्याची हमी घेणाऱ्या पालकाची किंवा नातेवाईकांची सही करून हमीपत्र लिहिलेलं होतं...

सुजितने एकदा ते त्यांना वाचून सांगितलं... थोडा वेळ विचार करत शेवटी काही उपाय नाही असं म्हणत कुमारच्या वडिलांनी त्या फॉर्म वर सही केली आणि तो फॉर्म भरून योग्य त्याठिकाणी  जमा केला... काही वेळातच वॉर्डबॉय आणि नर्स हवी ती औपचारिकता संपवून कुमारला स्थलांतर करण्याच्या कामाला लागले... रुग्णवाहिकाही दवाखान्याच्या बाहेर पायरीजवळ उभी करण्यात आली... ते सर्व ICU बाहेर उभे असतांना कुणी आवाज दिल्याचं ऐकू आलं...

" रुग्णाचे वडील कुठे आहेत? " नर्स

समोर येत कुमारचे वडील म्हणाले " काय झालं? मॅडम मी इथं आहे "

" तुम्ही चला माझ्यासोबत नोंदवहीत तुमची सही घ्यायची राहून गेली. " नर्स

नर्ससोबत जाऊन त्यांनी हवी तिथं सही केली आणि ते परत आले... जातेवेळी नर्सनी त्यांना सर्व गोष्टी आठवणीने सोबत घेऊन जायचं बजावलं... असं बोलतं असता सुजितचे लक्ष बॅगकडे वळले...

स्वतःशीच बोलत तो नजर इकडे तिकडे फिरवत - कुठे बरं ठेवली ती बॅग? शोधाशोध करत बाजूला त्याच्याच मागे भिंतीला टेकवून ठेवलेली त्याला दिसून आली लगेच उचलून त्याने पाठीवर घेतली... नंतर घाईत विसर पडू नये म्हणून... आकाशकडे पाहत तो म्हणाला.

इतक्यात एक वॉर्डबॉय हाती फाईल घेऊन आला... सांगू लागला...

" हि फाईल जपून ठेवा यात पेशन्टचे सर्व रिपोर्ट आहेत... कळलं... हं घ्या आणि सांभाळून ठेवा... "

असं म्हणत ती फाईल त्याने जवळच असलेल्या प्रशांतला दिली... वॉर्डबॉय कडे एकटक पाहत तो काहीतरी बोलला... पण ते कुणालाच कळलं नाही मग सुजितने पुढं होऊन ती फाईल घेतली आणि बॅगमध्ये ठेवली... तिथं आणलेल्या सर्व गोष्टी सोबत घेत ते जायच्या तयारीस लागले... सुजितचा मोबाईल वाजला... घाई घाईत कुणाचा फोन आहे हे न पाहता लगेच उचलून त्याने मोबाईल कानाला लावला...

" हॅलो... "

" हॅलो सुजित मी पोहोचले. बस स्थानक आहे ना तिथे उभी आहे. "

" तू आलीस का? ... " जरावेळ विचार करत कि आता काय करावं

" हो 5 - 10 मिनिटं झाली असतील, बरं दवाखाना कुठे आहे ते म्हणजे मला ऑटोने येता येईल... "

" तू तिथंच थांब, मीच तुला घ्यायला येतो तिथं "

" ठीक आहे " म्हणत तिने फोन ठेवला

सवयीप्रमाणे मोबाईलवर बोलत तो कधी बाहेर आला त्यासुद्धा कळलं नाही... परत जायला निघाला तर समोरून कुमारला दोघेजण धरून आणतांना त्याला दिसले. क्षणात त्यांनी कुमारला सलाईन आणि ऑक्सिजन मास्क सकट रुग्णवाहिकेत ठेवले... लगेच त्यांच्या पाठोपाठ कुमारचे आई वडील आणि बाकी सर्व तिथं आले. कुमार सोबत कुणीही दोन व्यक्ती जाऊ शकत होते म्हणून त्याचे आई

वडील जातील असं ठरलं पण त्याची आई आणखी दुःखी होऊन रडेल... यामुळे सुजितचे वडील सोबत जातील असे ठरविले... रुग्णवाहिका कुमारला घेऊन निघाली... आता प्रश्न हा होता की पाच जण दोन दुचाकीवर कसे जाणार त्यात भर पडली ती अशी की सुजितला बस स्थानक ला जावं लागणार होतं म्हणून...

" तिघे एका दुचाकीवरून जाणं काही बरोबर नाही, ट्राफिक पोलिसांनी पकडलं तर नसती उठाठेव करावी लागेल म्हणून ऑटोने जायला हवं... " सुजित म्हणाला

त्यावर आकाशचे वडील " मी घरी जाऊन यायचं म्हणत होतो... " तेव्हा एक दुचाकी घेऊन ते घरी तर कुमारची आई, प्रशांत आणि आकाश ऑटोने दवाखान्याकडे जायला निघाले... सुजित बसस्थानकाकडे...

## १६. प्रवास २

रुग्णवाहिका कुमारला जिल्हा रुग्णालय येथून घेऊन निघाली. सूर्य डोक्यावर आलेला... आजूबाजूला धुराचे लोट तर रस्त्यात वाहनांची गर्दी, सुरळीत वाहतूक सुरु राहावी यासाठी मध्येच येणारे स्पीड ब्रेकर... चौक आला की लाल दिवा लावून ट्रॅफिक सिग्नल वाटेत एक आणखी नवा सोबती थांबायला भाग पाडत होता तर एकीकडे भरधाव वेगाने एका नवीन प्रवासाला सुरुवात झाली... कुमारला मात्र या सगळ्या गोष्टींची काहीएक जाणीव नव्हती... त्याचे वडील मायेनं त्याच्या चेहऱ्याकडे पाहत होते. तो जणू डोळे मिटून या दुनियेपासून अलिप्त अश्या वेगळयाच दुनियेत हरवला होता...

त्याच्या मागेच काही अंतर ठेवून ऑटोने त्याची आई, प्रशांत आणि आकाश येत होते... ती माऊली ऑटोतून मान बाहेर काढून त्या रुग्णवाहिकेला पाहत होती पण जसजशी वेळ जात होती ते अंतर वाढत होत... एक क्षण असा आला की रुग्णवाहिका गर्दीतून वाट काढीत दिसेनाशी झाली...

रस्त्यात येणाऱ्या वाहनांच्या गर्दीला तोंड देत सुजित दुचाकी घेऊन बसस्थानकाजवळ पोहोचला. तर तिथं पुन्हा त्याला प्रवाश्याची गर्दी अन मध्येमध्ये येणाऱ्या बसचा सामना करावा लागला... मग कसातरी वाट काढीत तो एका दाट हिरव्यागार कडूलिंबाच्या झाडाजवळ पोहोचला, घामानं शरीर चिंब ओलं झालं होतं, तापत्या कडक उन्हात झाडाखाली दुचाकी उभी करून तो थंडगार सावलीने सुखावला मग मोबाईल बाहेर काढून त्याने तिला फोन लावला...

" हॅलो... सुजित बोलतोय "

" हॅलो... बोल सुजित "

" मी  बसस्थानका जवळ आलो, तु कुठे आहे? "

" मी इथंच तर आहे... " आजूबाजूला नजर फिरवत ती म्हणाली

" तुला कडूलिंबाचं झाडं दिसत आहे का? मी झाडाखाली उभा आहे "

तसं तिने ते झाडं शोधत नजर फिरवली  " हो दिसलं... मी आलेच तू थांब तिथेच " म्हणत तिने फोन कट केला, ती सुजीतकडे जायला लागली... दहा बारा पावलं चालत नाही तर ती त्या झाडाखाली पोहोचली...

त्याच्या जवळ उभी राहून...

"तू इथं आला मी तिथं बसस्थानकाजवळ तुझी वाट पाहत होते"

" सॉरी पण तिथं वाहनाची जरा जास्तच ये जा सुरु आहे... म्हणून..."

" अरे, दवाखाना कोणता ते सांगितलं असत तर मीच आले असते ऑटोने..."

मग त्याने कुमारला दुसऱ्या दवाखान्यात दाखल करावं लागल्याचं तिला सांगितलं... अन तो तिला सोबत घेत दुचाकीवरून जायला लागला... वाटेत तिने त्याला प्रश्न करत कालपासून ते या क्षणापर्यंत काय, कसं झालं ते सर्व विचारून घेतलं आणि त्याने तिला कुमारची डायरी  त्यात लिहिलेलं गुपित हे सोडून बाकी सर्व सांगितलं... कुमार अजूनही बेशुद्ध आहे सांगितल्यावर ती अबोल झाली... मग तो

सुद्धा जरा वेग वाढवून दुचाकी चालवायला लागला पण दुसऱ्या क्षणी त्याला कुमारचा चेहरा आठवला अन त्याने ब्रेक लावत वेग कमी केला...

इकडे हे असं घडत असता आर्यन राहत असलेल्या ठिकाणी...

कुमारला भेटायचं म्हणून तो सर्व काम तसेच सोडून HR ला भेटण्यात वेळ वाया न घालवता तसाच ऑफिसमधून निघाला. सुजितने त्याला कुमारच्या अपघाताची बातमी दिली तसाच तो HR ला सुटीचा अर्ज ईमेल करून रूमवर आला. त्याने तिकीट आधीच ऑनलाइन काढून घेतलं... पटकन बॅगमध्ये हवं ते सामान घेऊन तो रेल्वे स्टेशनला पोहोचला... रेल्वे यायला अर्धा तास वेळ होता, प्लॅंटफॉर्म वर आल्यानंतर त्याने बॅग खाली ठेवली, तो तिथल्या बाकावर रेल्वे येण्याची वाट पाहत बसला... मनात विचारांचं वादळ उठलं, कुमार ठीक तर असेल ना? त्याला फार लागलं की काय? ...

इतक्यात रेल्वे काही वेळातच प्लॅटफॉर्मला येणार अशी अनौन्समेंट त्याच्या कानावर पडली, तो भानावर आला... पाच एक मिनिटांनी कर्कश सिटी देत रेल्वे आल्याची त्याला दिसून आली... रेल्वे थांबते न थांबते तर लोकांची चढण्याची घाई सुरु त्याचबरोबर उतरण्याची सुद्धा... दाराजवळ उभा राहून तो गर्दीत उभा राहिला आणि आपोआप तो आत शिरला... सुदैवाने खिडकीजवळ जागा मिळाली, तो बॅग

बाजूला ठेवून तिथं बसला... पुन्हा शिट्टी देत रेल्वे स्टेशनला निरोप देऊन, प्रवाश्यांना घेऊन रेल्वे निघाली...

आर्यन शिक्षण पूर्ण झाल्यावर या शहरात  एका खाजगी कंपनीत नोकरी करत होता... या नवीन शहरात येऊन त्याला जवळ जवळ दोन वर्षे पूर्ण झाली होती. सुरुवातीला जरा नवीन शहराशी जुळवून घ्यायला वेळ लागला पण सुशिक्षित बेरोजगार म्हणवून घेण्यापेक्षा या परिस्थितीचा सामना करावा असं ठरवून त्याने इथेच जम बसविला... पण तो मित्रांसोबत संपर्कात होता हीच त्याची खास ओळख, कुमारला तो दर एक दोन दिवसाआड फोन करत होता... कुमार सोबत त्याची ओळख झाली ती पदवीला प्रथम वर्ष्याला असतांना ... मग कधी ते जिवलग मित्र झाले त्यांना कळलं नाही, पदवी पूर्ण झाली आणि सोबतच मास्टर्सला प्रवेश घेतला... त्यामुळे ते आणखी दोन वर्षे सोबतच होते... एकूण काय तर सलग पाच वर्षे ते दोघे जण एकत्र होते...

सतत संपर्कात राहिल्यानेच नातं अतूट बनतं... जीवाभावाची नाती जुळतात... कधी कधी तर ही नाती रक्ताच्या नात्यापेक्षा जवळची वाटायला लागतात... असचं काही कुमार आणि त्याच्या मित्रांबद्दल होतं... म्हणूनच त्याचा अपघात झाल्याचं कळताच आर्यन सगळं तसंच सोडून त्याला भेटायला निघाला...

यांचा असा प्रवास सुरू असता अनिरुध्द राहत असलेल्या शहरात...

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीसाठी तो घरापासून दूर या नवीन शहरात राहत होता... जिथे तो एका खाजगी कंपनीत ज्युनियर इंजिनियर म्हणून सहा महिने

पूर्वी रुजू झाला... तसं त्याने कुमारला फोन करून सांगितलं होतं... तर वेळ मिळेल तसा तो फोन करून त्याच्याशी बोलत होता... काल रात्री सुद्धा त्याने कुमारला फोन केला होता पण मोबाईल बंद असल्याने तो त्याच्याशी बोलू शकला नाही... जेव्हा त्याला कुमारचा अपघात झाला असे कळलं त्याला काही सुचेना... अचानक असं काही घडलं हे त्याचं मन मानायला तयार नव्हतं... म्हणूनच या धक्क्यातून सावरायला त्याला जरा वेळ लागला. मग तोही लगेच मॅनेजरला सांगून कुमारला भेटण्यासाठी निघाला... रेल्वे वेळाने जाणार असं समजल्यावर तो बस ने प्रवासाला निघाला... हवं ते एका बॅगमध्ये सोबत घेऊन तो बसमध्ये बसला, ऊन्ह चांगलंच तापत होतं त्यात आणखी एक भर म्हणजे सुटी असल्याने बस प्रवाश्यांच्या गर्दीने पूर्ण भरली... त्या गर्दीत कशीतरी जागा मिळवून तो बसमध्ये बसला आणि एकदाची बस सुरु झाली. धावपळ सुरू होती त्यामुळे त्याला विचारांची जाणीव होत नव्हती पण आता बसमध्ये बसल्यानंतर मनात कित्येक विचार एकामागून एक येत होते... इतक्यात त्याचा मोबाईल वाजला...

" हॅलो... अनिरुध्द, मी आर्यन... "

" हॅलो... आर्यन अरे तू कुठे आहेस आता...? "

" मी रेल्वे मध्ये आहे तुला सांगायचं होतं की कुमारचा अपघात झाला... "

" कळलं मला सुजीतकडून... मी निघालो तिकडे जायला... "

" ठीक झालं मला वाटलं कदाचित तुला माहित नसेल... "

" मी तुला सांगणार होतो पण तूच कॉल केला...  "

" ते जाऊ दे, तू कॉल केला काय आणि मी केला काय एकच तर आहे... "

" हो बरोबर आहे मी बसने येत आहे तेव्हा तू मला बस स्थानकाजवळ भेट... तेथून दोघे सोबत जाऊ... "

" ठीक आहे... तू पोहोचला कि मला कॉल कर... "

" हो ओके ठेवतो फोन "  म्हणत त्यांनी फोन कट केला...

इकडे रुग्णवाहिका कुमारला घेऊन पोहोचली... वॉर्डबॉय त्याला चाकांच्या बेडवर ठेवून आत न्यायला लागले सोबत त्याचे वडील आणि सुजीतचे वडील मागे मागे जात होते... दवाखाना अगदी स्वच्छ आणि सर्व सोयीसुविधायुक्त असल्याचे त्यांना दिसून आले... त्याचे रिपोर्ट डॉक्टर वैद्य यांनी आधीच पाहिले होते म्हणून त्याला ICU मध्ये दाखल करण्याचे सांगितले होते... त्याला ICU मध्ये दाखल केले

तोच डॉक्टर, नर्स यांनी त्याला तपासून त्याची अवस्था समजून घेत त्याला आवश्यक ते इंजेक्शन, सलाईन लावून ते बाहेर आले. कुमारच्या वडिलांची भेट घेऊन त्याला निरीक्षण करण्यासाठी आज रात्रभर ठेवू आणि उद्या सकाळीच ऑपरेशन करू काळजीच कारण नाही... सर्व ठीक होईल... असे डॉक्टर वैद्य यांनी सांगितले...

थोड्याच वेळात कुमारची आई, प्रशांत आणि आकाश सुध्दा दवाखान्यात पोहोचले... सरकारी आणि खाजगी यातील फरक पायरी चढून तिथल्या फरशीवर पाय ठेवताच त्यांना जाणवला. पुढे जात असता प्रशांत आणि आकाश समोरच inquiry counter आणि आजूबाजूला केलेली उत्तम रंगरंगोटी, waiting करीता हॉलमध्ये TV लावलेला असून बसण्याची केलेली सोय हे सगळं त्यांच्यासाठी नवीन होतं... समोर चालत जात असता मध्येच नर्सनी त्यांना थांबवून कुणाला भेटायचं आहे असा प्रश्न विचारला... तेव्हा कुमारचं नाव सांगितल्यावर नोंदवहीत त्यांची नावे लिहून त्यांना आत प्रवेश दिला...

मग पाच दहा मिनिटांनी सुजित, तिला घेऊन तिथे पोहोचला पण आत प्रवेश केला आणि त्यांना waiting करिता थांबवून ठेवलं... एकाचवेळी इतके जण रुग्णाला भेटायला जाऊ शकत नाही असा नियम असल्याचं नर्सने सांगितलं... मग काही वेळानंतर सुजितने कॉल करून प्रशांत आणि आकाशला बोलवून घेतलं... ते परत आल्यावर यांना कुमारला भेटायला ICU कडे जाता आलं... सुजित आणि ती तिथं आले, बाकी सर्व तेथून थोड्या दूर खुर्चीवर बसून होते... ते दोघे जण ICU च्या

दाराजवळ गेले, तिथे खुर्चीवर एक नर्स बसून होती. तिने त्या दोघांना तिथेच थांबवलं...

" कुणाला भेटायचं आहे तुम्हाला...? "

" कुमार... ज्याला आत्ता थोड्यावेळापूर्वी दाखल केलं... " सुजित

" सॉरी पण तुम्ही त्याला भेटू शकत नाही, त्याची कंडिशन सिरीयस आहे प्लिज... इथूनच पहा हवं तर "

आता काय करावं त्यांना काही सुचेना दाराच्या काचेतून नीटसं काही दिसत नव्हतं... त्यात सुजितने त्याला पाहिलं होतं पण ती इतक्या दुरून आली आणि तिला कुमारला असं दुरून पाहावं लागणार हे काही त्याला पटलं नाही... म्हणून तोच सुजित पुढे होऊन -

" मॅडम, प्लिज हिला आत जाऊ द्या मी नाही भेटत हवं तर... "

" नाही, नाही म्हटलं ना मी. "

" प्लिज मॅडम ती खूप दुरून आली आहे त्याला पहायला, तिला परत जायचं आहे आजच... प्लिज प्लिज... "

त्याच्या विनवण्या ऐकून त्या नर्सने परवानगी देत... " जा पण लगेच परत या जास्त वेळ आत थांबू नका आणि त्याला त्रास होईल असं काही करू नका "

त्यावर दोघांनी मानेनेच होकार दिला, ती आत त्याला पाहायला गेली... चार वर्षे झाली, तिने त्याला शेवटचं पाहिलं होतं पण आज असं अचानक त्याला भेटावं लागेल आणि ते हि अश्या अवस्थेत... असं मनातच स्वतःशी म्हणत ती

त्याच्याजवळ गेली... कितीतरी दिवसांनी ती त्याचा चेहरा पाहत होती, बहुदा हा तो नसावा असं तिला वाटून गेलं... चार वर्षे लोटली सगळंच बदललं होतं, आजूबाजूचे वातावरण, वेळ, परिस्थिती, नातं आणि बरंच काही, मग चेहरे सुध्दा बदलणार... असे विचार मनात येत असता ती त्याला न्याहाळून पाहत होती त्याची झालेली अवस्था तिला बघवत नव्हती... समोरच जरा धूसर दिसत असल्याचं तिला जाणवलं तर पापण्या ओल्या होऊन आसवं डोळयात तरळत असल्याचं तिला कळलं... लगेच आसवं टिपत ती हलकेच त्याच्या हाताला स्पर्श करून, त्याच्या प्रतिसादाची वाट पाहत होती पण तो काहीएक हालचाल करत नाही तिला समजलं आणि ती बाहेर आली...

ती बाहेर आल्याचं पाहून सुजित तिच्याजवळ गेला... तिने आसवं जरी पुसले पण त्यांनी स्वतःचं अस्तित्व अजून तिच्या पापण्यांखाली टिकवून ठेवलं होतं, तिला जरा बोलतं करावं असं वाटून तो म्हणाला...

" पाहिलं त्याला? " तिच्या नजरेला नजर देत

त्यावर तिने नुसतं मान हलवून " हं " इतकंच म्हटलं.

मग तो तिला घेऊन कुमारच्या आईजवळ आला, ती माऊली समोरच एक मुलगा आणि त्या मुलाची आई त्याला भरवत असल्याचं पाहून मनातच कुमारला जेवू घालता यावं या कल्पनेने कदाचित... तिला पुन्हा गहिवरून आलं... त्याने जवळ जाताच...

" काकू, काकू... " सुजित आवाज देत

आसवं पदराला पुसून वर पाहत " सुजित आलास तू? " ती म्हणाली

" हो काकू, अन सोबत बघा कोण आहे ते... " तो म्हणाला

तिने बाजूला पाहिले... " तू कधी आलीस? तुला कसं कळलं? "

" आत्ताच आले काकू, सुजितने फोन करून मला सांगितलं... "

मग तिला बाजूच्या खुर्चीवर बसायला सांगून त्याने पाठीवरची बॅग दुसऱ्या बाजूला ठेवली... तो त्याच्या वडिलांजवळ गेला...

ती कुमारच्या आईजवळ बसली आणि तिला धीर देत...

" लवकरच बरा होईल कुमार. तुम्ही सांभाळा स्वतःला... "

" हो पण कसं सांभाळू मी मला? कालपासून पोरं तसंच झोपून आहे. साधा डोळा त्यानं अजून उघडला नाही की शब्दानं बोलला नाही... "

आता मात्र काय बोलावं तिला कळत नव्हतं. तिने खांद्यावर हात ठेवून थोपटत तिला जवळ घेतलं...

तसा हुंदका देत ती आणखी व्याकुळ झाली आणि अनावर होऊन रडत, सांगू लागली... माझा कुमार अगदी साधा आहे कधी कुणाशी भांडण नाही की दोनदोन शब्द म्हणून कुणाचं मन दुखावत नाही, आम्हाला वर आवाजात कधी बोलला नाही, का म्हणून ही वेळ आमच्यावर आली ते कळत नाही... बरं ' तो ' परीक्षा पाहतो कि काय नियतीला ठाऊक, पण मी काय काही कमी करते ' त्याच '... तरी माझा कुमार आज असा पडून आहे...

असं बरंच काही ती मनमोकळं बोलत होती... तिला आता कुठे जरा आधार मिळाला होता, त्यामुळं तिचं मन हलकं झालं... प्रशांत आणि आकाश समोरच्या बाजूला एका रांगेत ठेवलेल्या खुर्चीवर बसून होते... ते जवळ येऊन तिला धीर देत होते...

अर्धा पाऊण तास झाला , डॉक्टर देवांश वैद्य कुमारला तपासून परत जात असतांना... त्याचे रिपोर्ट कुठे आहेत? असं डॉक्टर वैद्य यांनी विचारलं... तेव्हा सुजित कुमारचे रिपोर्ट बॅगमधून काढून घेऊन आला त्यावेळी बॅगमधून डायरी खाली पडली तर घाईघाईत ती डायरी आकाशला बॅगमध्ये ठेव असं सांगून त्याने ते रिपोर्ट डॉक्टरांना दिले... अन तो तिथंच बाजूला उभा राहिला, डॉक्टर त्यावर एक नजर फिरवून...

" सगळं नॉर्मल आहे, उद्या सकाळी कुमारचं ऑपरेशन होईल. ठीक आहे, तुम्ही २५००० हजार रुपये जमा करून घ्या बाकी ऑपरेशन झाल्यानंतर, सुटी व्हायच्या आधी द्यावे लागतील... " असं म्हणत डॉक्टर वैद्य ते रिपोर्ट सोबत घेऊन केबिनमध्ये गेले...

कुमारचे वडील जरा खाली बसले, सुजितचे वडील त्यांच्या जवळ येऊन म्हणाले...

" चला, पैसे जमा करून घेऊ "

" हे तर २५००० हजार रुपये जमा करा म्हणताहेत... तुम्हाला माहिती आहे जवळ फक्त २०००० च आहेत... आता काय करायच? "

त्यांना धीर देत " तुम्ही काळजी करू नका, मी सोबत आणले आहेत काही तुम्ही चला तर खरं... "

मग दोघे सुजितला सोबत घेऊन काउंटर जवळ आले... आवश्यक ती माहिती भरून सुजितने फॉर्म सबमिट केला तर त्याच्या वडिलांनी ५००० रुपये खिश्यातून काढून कुमारच्या वडीलांना दिले असे २५००० रुपये त्यांनी जमा केले... तिघे ICU कडे परतले...

ते दोघे जरा हॉलकडे जायला निघाले तर सुजित त्या दोघी बसल्या होत्या तिथं येऊन त्यांच्या बाजूला उभा राहिला...

तेव्हा जवळ जवळ 4 वाजून गेले होते, ती कुमारच्या आईला मी आलेच असं म्हणत सुजितकडे आली...

" सुजित, काय म्हणाले डॉक्टर? "

" रिपोर्ट नॉर्मल आहे आणि उद्या सकाळी ऑपरेशन करणार असं म्हणाले..."

" खूप लागलं कुमारला... "

" हो ना कसं झालं काही कळत नाही "

जरावेळ दोघंही शांत राहिले... मग मोबाईल मध्ये वेळ पाहत ती म्हणाली...

" मला निघायला पाहिजे. मी घाईघाईत माझ्या ह्यांना न सांगताच इकडे आले तर उशीर व्हायच्या आधी मी घरी जायला हवं... "

त्यावर तो म्हणाला...

" ठीक आहे, चल मी तुला बस स्थानक येथे सोडून परत येतो... "

" जाईल मी तू राहू दे... "

" चल मी येतो सोबत... "

मग तिने त्याच्या आईचा निरोप घेत, काळजी करू नका, सर्व ठीक होईल, तो लवकर बरा होईल असं म्हणत  तिने बाजूच्या खुर्चीवर ठेवलेली हँडबॅग उचलली... प्रशांत जवळ जाऊन त्याला काळजी घे, तुझी आणि काका काकूंची सुध्दा... त्याच्या आई वडिलांना ' येते मी ' असं म्हणत परत जायला निघाली...

सुजित तिला घेऊन बस स्थानकाकडे दुचाकीने जात होता... तिला कुमारच्या डायरीबद्दल सांगावं असं राहून राहून त्याच्या मनात येत होतं पण नेमकं तिला कसं सांगावं? काय काय सांगावं? त्याला कळत नव्हतं... विचार करत असताना तो बस स्थानक जवळ पोहोचला त्याच्या लक्षात आलं नाही तेव्हा त्याला आवाज देत तिने त्याला दुचाकी बाजूला थांबवायला सांगितलं...

तशी दुचाकी बाजूला लावून तो तिला बस पर्यंत सोडून द्यायला तिच्यासोबतच गेला... तिला सर्व सांगून टाकावं असं वाटून त्याने बसमध्ये चढतेवेळी तिला म्हटलं...

" जरा थांबशील पाच मिनिट... "

" काय झालं? सुजित "

नेमकं काय म्हणावं आता? हाच प्रश्न त्याला रोखून होता... तरी तो समोर आला...

" काही नाही, व्यवस्थित जा आणि पोहचल्यावर मला फोन कर... कुमारच्या नंबर वर फोन केला तरी चालेल त्याच सिमकार्ड माझ्याच मोबाईल मध्ये आहे... "

" हो बरं येते मी... काळजी घे, मी येईल परत... त्याला भेटायला " म्हणत ती बसमध्ये चढली आणि सीटवर बसली

खिडकीतून त्याला हात हलवून बाय करत तिने जाते असा इशारा केला... काही वेळातच बस सुरु झाली आणि प्रवाश्यांना घेऊन जायला लागली...

## १७. नकळत...

बस निघून गेली पण सुजित अजूनही तिथेच थांबून होता... त्याला जे गुपित डायरी वाचल्यानंतर कळलं होतं ते तिला सांगणं गरजेचं होतं असं त्याला वाटतं होत. ' मी तिला सगळं सांगून टाकायला हवं होतं पण आता वेळ निघून गेली... का म्हणून मी तिला सांगू शकलो नाही? कुमारने जर मला कधी कळू दिलं नाही तर आणखी कुणाला माहित असणं अशक्य... शेवटी जे काय झालं ते तसेच कुमार आणि त्याच्या डायरीतच गुप्त राहावं असा नियतीचा कौल असावा... ' मनातच हे सर्व काही तो स्वतःलाच सांगत होता, त्याचा मोबाईल वाजला...

" हॅलो सुजित... मी अनिरुध्द बोलत आहे. "

" हॅलो बोल ना, तू निघाला का? "

" हो मी बसने येत आहे आणि मला आर्यनने फोन केला होता... तिथं आल्यानंतर आम्ही दोघे सोबतच येणार आहोत... "

" अच्छा, तरी किती वेळ लागणार अजून... "

" मला अर्धा तास तरी लागेल आणखी... "

" मी भेटतो तुम्हाला बस स्थानक येथे, इथे आले कि मला कॉल करून सांगा. ठीक आहे "

" हो, आता तब्येत कशी आहे कुमारची... "

त्यावर अजून तो बेशुध्द असल्याचं आणि उद्या सकाळी ऑपरेशन होणार असं त्यानं अनिरुध्दला सांगितलं... बाकी परस्पर भेटल्यावर बोलूया असं म्हणत फोन कट केला... थोड्या वेळाने पुन्हा परत यावं लागणार म्हणून तो आर्यन आणि अनिरुध्द यांची वाट पाहत तिथंच थांबला... रस्त्याने वाहनांची वर्दळ सुरु होती, तापत्या उन्हामुळे प्रवासी त्रस्त झाले होते पण वेळ काळ आहे तसा सोसून जगावं लागतं हेच जीवनाचं सत्य आहे... स्वतःलाच सांगत डायरीच्या दुनियेत सफर करायला लागला...

अनिरुध्द बस स्थानक येथे पोहोचला, फोन करून त्याने सुजितला शोधलं आणि त्यांची भेट झाली. काही वेळाने आर्यन सुध्दा ऑटोने तिथं आला... तो ऑटोतून उतरतेवेळी सुजितला दिसला तेव्हा दोघेही त्याच्या जवळ जाऊन त्याला भेटले... दुचाकी सुरु करत सुजित म्हणाला.

" चला आता निघूया... "

" अरे सुजित थांब जरा, ऋतुराज येणार आहे... " आर्यन म्हणाला

" कोण ऋतुराज? " सुजितने विचारलं

" मित्र आहे, पदवीला असतांना आमच्यासोबत होता , तू ओळखतो त्याला " आर्यन...

" पण हे नाव तर मी पहिल्यांदाच ऐकतो आहे " सुजित म्हणाला तेव्हा दोघे आर्यन कडे पाहत होते...

" बरं थांबा पाच दहा मिनिटे, बस येईलच तो " म्हणत आर्यनने त्याला फोन लावला... फोन लागला पण तो फोन उचलत नव्हता म्हणून फोन कट करून त्याने पुन्हा लावला तोच समोरून दुचाकी चालवत तो तिथं येत असल्याचं त्यांना दिसलं... दुचाकी वळवून त्याने ते तिघे उभे होते तिथून काही अंतरावर थांबून मोबाईल बाहेर काढला आणि आर्यनला फोन लावला... तोच आर्यन त्याला आवाज देत असल्याचे त्याने ऐकलं... मोबाईल खिश्यात ठेवून तो त्यांच्याकडे जायला लागला...

" अरे मी ओळखतो याला, कुमार सोबत भेटलो होतो एक दोनदा पण याच नाव... कुमारने काही वेगळंच सांगितलं होतं... हा आठवलं Rj... हेच नाव सांगितलं होतं कुमारने " सुजित म्हणाला

" अच्छा अरे कुमारने दिलेलं नाव आहे ते" आर्यन असं सांगत होता तेवढ्यात ऋतुराज तिथं पोहोचला. तिथंच सुजितला ते तिघे कुमार कसा आहे? कसा काय झाला अपघात? खूप लागलं का त्याला? ऑपरेशन झालं का मग? असे कितीतरी प्रश्न विचारत दुचाकीने दवाखाण्याकडे जायला लागले...

त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत सुजितने त्यांना कुमारची काय अवस्था झाली ते सांगितले, त्याचबरोबर तो अजूनही बेशुध्द आहे हे ऐकून त्यांना धक्का बसला होता... खरं तर त्यांनासुद्धा कुमारचा दुचाकी चालवितांना अपघात झाला हे स्वप्न कि वास्तव हे कळत नव्हतं... पण आपल्या मान्य न करण्यामुळे वास्तविकता बदलत नाही जे घडलं ते नाकारता येत नाही... शेवटी आपलं मन हे त्याचं गोष्टींवर लवकर विश्वास ठेवतं ज्यात आपला आनंद आहे, ज्यामध्ये आपल्या मनाचं समाधान आहे...

थोड्याच वेळात ते दवाखान्यात पोहोचले, एकाचवेळी सर्वांना आत प्रवेश देणार नाही हे सुजितला ठाऊक होत. त्याने आधीच प्रशांत आणि आकाशला बाहेर बोलावून घेतलं... आळीपाळीने आत ICU मध्ये जाऊन त्या दाराच्या काचेतुनच त्यांनी कुमारला पाहिलं... तिथं आल्यावर त्यांना सर्व जे काय घडलं ते वारंवार ऐकून समजलं आणि त्यामुळे फोनवर ऐकून जितकं दुःख झाल त्यापेक्षा जास्त कुमारला डोळ्यासमोर या अवस्थेत  पाहून त्यांनी अनुभवलं... आत कुमार अजून तसाच पडून होता, त्याला आत जाऊन भेटावं असं प्रत्येकाला वाटत होतं पण कुणालाही परवानगी मिळाली नाही... बराच वेळ प्रयत्न करून हाती अपयश आले आणि ती नर्स ऐकायला मुळीच तयार नव्हती म्हणून सरतेशेवटी हार मानून ते सर्व कुमारच्या आई वडिलांना भेट देऊन त्यांना धीर देत होते...

आता सायंकाळ होऊन अंधार पडला, तशी रुग्णांना भेटावयास येणाऱ्यांची गर्दी व्हायला लागली... मित्र परिवार, नातेवाईक रुग्णाला भेट दिली की काळजी घ्या, देव ठीक करेल, नशीब दुसरं काय ! असं बरंच काही बोलून निघून जात होते... तसे काही नातेवाईक कुमारला सुध्दा भेट देऊन परत जात होते पण तो बेशुध्द होता त्यामुळे त्याला बाहेरून पाहून त्याच्या आई वडिलांना धीर देत होते... येतांनी प्रत्येक जण काही न काही घेऊन येत पण ते सगळं तसेच पडून होत... कुणाला ते खायची ईच्छा होत नव्हती... परत घेऊन जा म्हणावं तर त्यांना वाईट वाटेल म्हणून ते सर्व एका जागी जमा केल होत...

वेळ अशीच निघून जात होती सर्व कुमार कमीत कमी आतातरी शुद्धीवर येईल या आशेवर होते पण तो होता तसाच निपचित पडून होता... मग सर्वांनी एकत्र चहा घेतला आणि आत बाहेर आळीपाळीने चकरा मारीत हि रात्र कशीतरी घालवावी लागेल हे लक्षात घेता बाकीच्यांना घरी पाठविलं तर बरं होईल असं ठरवल... तेव्हा इतके जण तिथं थांबू शकत नाही असं कळलं, मग निदान चार जण तिथंच मुक्कामी राहतील असं ठरलं पण कुमारची आई, प्रशांत दोघेही घरी जायला तयार नव्हते तर दोन्ही वडील मंडळी तिथं असणं आवश्यक असल्याने शेवटी आर्यन, अनिरुध्द आणि सुजित हे रात्रभर ऋतुराज सोबत त्याच्या घरी जायचं, सकाळी लवकर उठून दवाखान्यात परत यायचं ठरवून तिथून निघाले... त्यांची तिथून बाहेर जायची इच्छा होत नव्हती पण दुसरा पर्याय नव्हता म्हणून ते जरावेळ आणखी प्रयत्न करीत होते पण कुणीही घरी परत जायला तयार नव्हतं... मग ते चारजण दुचाकी ने त्याच्या घरी गेले... त्याने घरी फोन करून मित्रांना सोबत घेऊन येत असल्याचे आधीच सांगितलं होतं. हातपाय धुवून ते त्याच्या रूम मध्ये बसले. जवळपास आठ वाजलेले... पण तरीही त्यांच्याकरिता चहा घेऊन त्याची बहीण आत आली... चहा घेत ते कुमारबद्दल बोल्त होते, असे व्हायला नको होतं... हेच वाक्य ते वारंवार बोलत होते... मधेच उद्या सकाळी ऑपरेशन व्यवस्थित पार पडले की कुमार लवकर बरा व्हायला पाहिजे हीच त्यांची मनोमन ईश्वरचरणी प्रार्थना...

मग थोडं जेवण करून ते सर्व गच्चीवर जमले. निळं निळं आभाळ चटक चांदणं रात्र, चंद्राची कोर उमललेली, दाट झाडीत लुकलुक चमकणारे काजवे, मध्येच कितीतरी दुरून प्रवास करत येणारी वाऱ्याची झुळूक सोबत मोगऱ्याचा सुगंध लेवून आली... असा मनमोहक देखावा पण त्याकडे त्यांचं लक्ष नव्हतं तर कुमार जागा झाला

असेल काय? हा विचार ते करत होते मग न राहवून त्यांनी आकाशला फोन करून विचारलं पण त्यांची निराशा झाली...

मग पुन्हा एकदा सर्व कुमार आणि त्याच्यासोबत शेवटी कधी, काय बोलणं झालं हे सांगत होते... त्याच्या आठवणी तो तिथं नसून असल्याचं भासवत होत्या आणि तो सोबत असतांना काय काय मज्जा मस्ती केली ते आठवून ते पुन्हा एकदा ते सारं काही जगत होते... बराचवेळ हे असं सुरु असता मध्येच वास्तवाची जाणीव झाली की चिंतेची लहर चेहऱ्यावरचे सारे भाव बदलत होती... कुमारबद्दल बोलता बोलता नकळत सुजित त्याच्या डायरीबद्दल बोलून गेला आणि सर्व काहींक्षणासाठी तिथंच थांबलं... तिघे त्याला विचारायला लागले कोणती डायरी? कुमारने डायरी लिहिली? त्याने तुला कधी दाखवली आणि आम्हाला कसं माहित नाही? ...

प्रश्नाचा भडिमार सुरु झाला तसं आता काही लपविण्यात अर्थ नाही हे लक्षात घेऊन सुजितने त्यांना ती डायरी कशी मिळाली ते सांगितलं आणि त्यालाही आधी डायरीबद्दल काहीच माहिती नव्हती हे हि सांगितलं... मग काय तिघे ती डायरी वाचायची म्हणून त्याला ती डायरी मागायला लागले पण इकडे येतेवेळी नळकत बॅग तिथंच राहिली होती...

मग त्याने उद्या सकाळी तिथं गेल्यावर मी ती डायरी तुम्हाला देईन पण एक वचन तुम्ही मला द्यायला हवं ते म्हणजे मी हे डायरीचं गुपित उघड केले हे कुमारला माहीत होता कामा नये... जर आपण कितीतरी दिवसांपासून मित्र असून कुणालाच त्या डायरीबद्दल कुमारने सांगितलं नाही तर त्यात जे काय त्याने लिहिलं

ते त्याच्या नजरेत गुपित राहिलेलं ठीक असेल... त्यावर एक मत होऊन तिघांनी होकार दिला, सुजितने तर संपूर्ण डायरी वाचली होती... या तिघांना मात्र आता झोप येत नव्हती की कुमारने नेमकं त्या डायरीत काय लिहिलं असेल...? त्यांनी सुजितला खूप विचारलं पण त्याने " स्वतः वाचण्यात जी गोष्ट आहे ती माझ्या तोंडून ऐकण्यात नाही " असं बोलून टाळलं...

तरी खूप विनवण्या केल्याने सुजितने काही किस्से त्यांना सांगितले आणि ते ऐकत असता रात्रीचे बारा वाजले त्यांना कळलं नाही... मग ते सर्व कुमार सोबत असताना घालवलेले क्षण आठवत झोपी गेले... मनात कुठेतरी दोन भावना... एक चिंतेची कि उद्या ऑपरेशन आणि दुसरी म्हणजे ती डायरी वाचायला मिळेल...

इकडे दवाखान्यात जेवण तर कुणीच केलं नाही घरून आणलेले टिफिन अजून तसेच होते मग एकमेकांना समजून सांगत ते कसेतरी थोडं थोडं जेवून खुर्चीवर बसले. झोप येत नव्हती म्हणून ते जुन्या आठवणी ताज्या करत कुमार बद्दल बोलत वेळ घालवत होते, असंच होतं जीवनात नेमकं जेव्हा आपण नजरेआड झालो कि सर्वांना आठवण येते, सोबत नसल्याची खंत वाटते, जाणीव होते...

यावेळी त्याच्या कुटुंबियांची आणि मित्रांची स्थिती अशीच झाली होती, डोळे जड होत पण तरी कुणाच्याही डोळयाला डोळा लागला नाही... मग आधी प्रशांत, आकाश झोपले... जवळ जवळ मध्यरात्र उलटली तेव्हा कुमारचे आई वडील आणि सुजितचे वडील... आता उद्या सकाळी ऑपरेशन होईल आणि कुमार बरा होईल अशी अपेक्षा मनात ठेवून यांना झोप लागली. ती रात्र तेवढी बाकी होती, उद्याची

सकाळ एक नवीन दिवस, नवीन वळण घेऊन येणार आहे... दुःखाचा सागर तरून सुखाचा किनारा लाभणार... हि आशा त्यांच्या मनात घर करून होती. पण वास्तविक पाहता निराशा हि मनात असलेल्या एका आशा, अपेक्षापेक्षा उत्तम... कारण ती येते त्या वेळेपुरते दुःख देते आणि आपल्याला कालांतराने त्या निराशेचा विसर पडतो पण आशेचं तसं नाही जोपर्यंत ती आशा पूर्ण होत नाही तोपर्यंत मन ती आशा, अपेक्षा पूर्ण होईल असं मानून प्रत्येक क्षणाला त्याभोवती आणखी गुरफटत जाते...

याक्षणी कुमारच्या कुटुंबियांची आणि मित्रांची अवस्था अशीच काहीशी झाली होती, ते सर्व आस लावून होते की उद्या एकदाच ऑपरेशन झालं की सर्व ठीक होईल अगदी आधी होतं तसं... आपण हेच मानून असतो की आपण जे काय विचार करून ठेवलं ते तसंच होईल पण काही गोष्टी आपल्या हाती नसतात हेच खरं...

चंद्र आणि चांदण्यांना निरोप देऊन रात्र संपून सूर्यकिरणांनी पहाटेच सर्वांचं पुन्हा एकदा नव्याने स्वागत केलं... तो दिवस उजाळला, कुमारचे आई वडील पहाटेच उठून ICU बाहेर दाराजवळ त्याला पाहत होते. मनात कित्येक विचार आणि भावना उचंबळत होत्या, कुमारला आज एकदा नवीन जन्म मिळणार आहे असं त्यांना वाटून गेलं... अगदी काही वेळात त्याच्या बालपण पासून ते आताच तो क्षण सारं कसं नजरेसमोर उमटत होतं... सुजितचे वडील, प्रशांत आणि आकाश सूद्धा जागी झाले, बाकीचं सर्व आटोपून त्यांनी चहा घेतला... तर ७ :३० वाजलेले... ऑपरेशन ची तयारी सुरु झाली... इतक्यात अनिरुध्द, आर्यन, सुजित आणि ऋतुराज तिथं आले... डॉक्टर वैद्य, जिल्हा रुग्णालय मधील डॉक्टर आणि नर्स यांनी कुमारला तपासून ऑपरेशन थिएटर मध्ये आणले. त्याला समोरून घेऊन जात असतांना त्यांच्या पापण्या नकळत जरा ओलसर झाल्या... त्याला आत नेलं तेव्हा ऑपरेशन थिएटरचं

दार बंद करून लाल दिवा सुरु झाला तेव्हा बाजूच्या भिंतीवर लावलेलं घड्याळं ठोका देऊन ८:०० वाजले असं सांगत होतं...

कुमारचं आत ऑपरेशन सुरु झालं तसं बाहेर वाट पाहत बसलेले त्याचे आई वडील, मित्र यांना वेळ जणू काही जागीच थांबून आहे असं वाटत होतं... पण त्याला आत जाऊन जवळपास एक तास झाला होता, इतक्या वेळ कुणीच काही बोललं नव्हतं... वेळ तशी होती की तिथं शांतता पसरली होती, पण काहीच न बोलता असं शांतता दाखवत असलेलं मन हे वरवर स्थिर राहून आत खोल पाण्यात खळबळ सुरु असलेल्या नदीच्या पात्रासमान असतं...

मग अचानक त्या डायरीबद्दल मनात विचार आला म्हणून आर्यन ने हळूच सुजितला विचारलं की ती डायरी तू आम्हाला देणार होता ती कुठे आहे? हे त्या चौघांनी ऐकलं आणि एकसाथ सुजीतकडे नजरेनं इशारा करत ऋतुराज आणि अनिरुध्द यांनी तेच विचारलं...

त्यावर काही न बोलता सुजितने समोरच खुर्चीवर ठेवलेल्या बॅगकडे बोट दाखवून त्यांना इशारा करत त्यामध्ये डायरी असल्याचं सांगितलं... मग हळूच उठून आर्यनने ती बॅग इकडे आणली आणि उघडून पाहिली तर त्यात काहीही नसल्याचं त्याला कळलं... पुन्हा सुजितला बॅग रिकामी असल्याचं त्याने इशाऱ्याने म्हटलं, मग सुजितने स्वतः ती बॅग हाती घेतली आणि आत पाहिलं पण जी डायरी त्यात नाही ती कितीही शोधली तरी मिळणार कशी? ??

मनातच विचार करत सुजितने कपाळाला हात लावला... डायरी बॅगमध्येच तर ठेवली होती मग यांत नाही तर गेली कुठं...? असा विचार करत असता त्याच्या एक चूक झाली हे लक्षात आलं... स्वतःशीच तो पुटपुटला जे झालं ते योग्य कि अयोग्य...? नकळत चूक झाली का माझ्याकडून...?

तर आर्यन, अनिरुध्द आणि ऋतुराज यांच्याही मनात प्रश्न आल्यावाचून राहिला नाही... की डायरी बॅगमध्ये नाही तर मग आहे तरी कुठं...? सुजित इथं नसतांना आणखी कुणाला तर ती मिळाली नाही ना...? अशी शंका हि एका क्षणासाठी त्याच्या मनात येऊन गेली... आता सुजितच काय झालं त्या डायरीचं हे सांगेल या अपेक्षेने त्याच्याकडे पाहत होते... तर सुजित कसल्यातरी विचारात मग्न झालेला...

## १८. नियतीचा खेळ...

आत कुमारचं ऑपरेशन सुरु होतं, पण त्याची काहीएक जाणीव त्याला नव्हती. तो आधीच बेशुध्द होता आणि ऑपरेशन सुरु करण्यापूर्वी डॉक्टरांनी त्याच्या काही अवयवांना सुन्न करेल असे इंजेक्शन दिले होते... जवळ जवळ दीड तास झाला तरी ऑपरेशन सुरूच होते... कुमारच्या आई वडिलांना काळजी वाटत होती की आत जाऊन खूप वेळ झाला पण अजून काही कुमारला बाहेर आणलं नाही, तो ठीक तर असेल ना? ती माउली मनोमन, " परमेश्वरा माझ्या कुमारला वाचव, त्याला जीवन दे, या संकटातून आमची सुटका कर अशी प्रार्थना करत होती. "

तर बाहेर खुर्चीवर बसून खूप वेळ झाला होता म्हणून जरा वेळ उठून थोडं समोर चालत जाऊन आर्यनने इशारा करून सुजितला बोलावलं... तो उठून आर्यन मागे जायला निघाला तर पाठोपाठ अनिरुध्द आणि ऋतुराज हि उठले. आर्यन काही अंतर चालत जात थांबला. सुजित त्याच्या जवळ आला... इतक्यात अनिरुध्द आणि ऋतुराज तिथं पोहोचले... " कुमारला आत नेऊन बराच वेळ झाला पण अजून बाहेर आणलं नाही !"आर्यन म्हणाला

त्यावर तिघेही एकमेकांकडे पाहून त्याबद्दल काहीएक माहिती नसल्याने शांत होते... "ऑपरेशन कितीवेळ चालणार हे सांगितलं असणार नव्हतं का आधी?" ऋतुराजने मनातील शंका सांगितली

"पण तसं काहीही डॉक्टरांनी सांगितले नाही" सुजित म्हणाला

" कुमारचं ऑपरेशन तेवढं व्यवस्थित पार पडलं की झालं... मग तो लवकर बरा होईल... " अनिरुध्द म्हणाला

सर्व शांत झाले. मग जरावेळ असाच निघून गेला, पण बोलणं थांबलं कि मनात विचार यायला सुरुवात होते, नेमकं मन जड झालं की विचारांची गर्दी व्हायला लागते... असेच विचार करत असता त्यांना कुमारच्या डायरीबद्दल आठवलं सुजित काल रात्री बोलला होता पण अजून काही त्याने ती डायरी दाखवली नाही... " सुजित, तू काल रात्री डायरी वाचली म्हणून सांगितलं पण आम्हाला अजून तरी ती डायरी कुठं ठेवली ते सांगितलं नाही... " अनिरुध्द

त्याला दुजोरा देत आर्यन आणि ऋतुराज ने सुजीतकडे एक नजर टाकली तर तो डायरी बॅगमध्ये नाही तर आहे तरी कुठं असा विचार करत, " मी डायरी बॅगमध्येच ठेवली होती "

" पण आता डायरी त्या बॅगमध्ये नाही... " ऋतुराज म्हणाला

सुजित दुचाकी ची चावी बोटात फिरवत... " एक मिनिट मला जरा आठवू दे... "

काही मिनिटांनी त्याला आठवलं कि काल जेव्हा डॉक्टरांना रिपोर्ट द्यायचे होते तेव्हा ती डायरी बॅगमधून खाली पडली होती... घाई घाईत त्याने ती आकाशकडे दिली होती.

लगेच फिरवत असलेली चावी हातात घट्ट धरून तो म्हणाला " हा आठवलं, डायरी कुठं आहे. "

तिघे एकसाथ म्हणाले " कुठं...? ?? "

" ती डायरी आकाश जवळ आहे, मी काल त्याला दिली. " सुजितने काल जे काय झालं ते त्यांना स्पष्ट करून सांगितलं... एक मिनिट मी आकाशला भेटून आलोच म्हणत तो आकाश कडे गेला...

" आकाश, जरा एक मिनिट बाजूला ये. " जवळ जाऊन हळूच तो म्हणाला

" काय म्हणतोस...? "

" अरे काल मी तुला एक डायरी म्हणजे एक बुक दिलं होत... आठवते... "

जरा वेळ आठवून " हो काल दुपारी ना "

" हो ते तू कुठं ठेवलं? "

" तू सांगितलं होतं ना बॅगमध्ये ठेव म्हणून मी त्यातच ठेवलं "

" पण आता ती डायरी, बुक त्या बॅगमध्ये नाही. "

" मी तर बॅगमध्येच ठेवली डायरी " आकाश म्हणाला

" बरं मग ती बॅग इकडे आण आणि दाखव ती डायरी कुठं आहे ते " सुजित जरा वैतागून बोलला

आकाश मनातच 'वेळ कोणती आणि हा काय त्या डायरीचं घेऊन बसला'... आकाश बॅग घेऊन आला पण त्याला त्यात काहीच मिळालं नाही... " मी तर डायरी बॅगमध्येच ठेवली होती... " तो म्हणाला

" मग आता कुठे आहे? " सुजित

मग बॅग हाती घेऊन तो न्याहाळत पाहू लागला... " हि ती बॅग नाही... "

सुजित एकदम आश्चर्याने त्याच्याकडे पाहून जागेच भान हरपून जरा जोरात... " काय? "

मग आवाज कमी करून " हि ती बॅग नाही म्हणजे काय...? तू कोणत्या बॅगमध्ये टाकली होती...? "

" काल हि बॅग होती तिथंच आणखी एक बॅग होती... त्यात टाकली... "

सुजीतच्या काळजाचा ठोका चुकला, म्हणजे याने ती डायरी तिच्या बॅगमध्ये टाकली... हे काय झालं? मी काल कितीतरी वेळ प्रयत्न केला की तिला डायरीबद्दल सांगायला हवं पण मला तिला सांगणं जमलं नाही पण जर तिला हे गुपित माहित व्हायचं असा नियतीचा डाव असेल तर तो काही चुकणार नव्हता... स्वतःलाच कसतरी समजावत तो तेथून परतला आणि जे काय आकस्मिक घडलं त्याने त्या तिघांना सांगितलं...

तर पुन्हा नवीन प्रश्न निर्माण झाला की ती म्हणजे कोण? कुणाजवळ आहे डायरी? अपेक्षित प्रश्न त्यांनी विचारला...

आता मात्र यांना सर्व सांगून टाकावं असा मनात विचार करून तो म्हणाला...

" चला जरा बाहेर बसूया मी तुम्हाला सगळं काही सांगतो... " ते चौघेही बाहेर जायला निघाले तर दार उघडून कुमारला बाहेर आणत असल्याचं त्यांना दिसून आलं... ते मागे फिरून ऑपरेशन थिएटर कडे वळले...

कुमारला लगेच ICU मध्येच ठेवण्यात आलं... डोक्याला पांढऱ्या पट्ट्यांनी झाकलं होतं, हाताला सलाईन लावलेली असं चित्र त्याला समोरून घेऊन जात असताना त्यांनी पाहिलं... त्याचे आईवडील तिथं दाराजवळ गेले तर नर्सने त्यांना कुमारला जरा आरामाची आवश्यकता आहे असं म्हणून बाहेरच थांबविलं... मग डॉक्टर तिथं आले आणि त्यांनी कुमारच्या आईवडिलांचे अभिनंदन केले...

" ऑपरेशन व्यवस्थित पार पडलं, तीन चार तास झाले की त्याला जाग येईल, काळजी करू नका तो लवकर पूर्ण पणे बरा होईल "

त्यांचं असं बोलणं ऐकून सर्वांना समाधान वाटलं... आता कधी एकदा त्याला जाग येते आणि त्याला जाऊन भेटतो असं त्याच्या आईलाच नाही तर सगळ्यांना वाटत होतं... त्यांनी मनापासून डॉक्टरांचे आभार मानले आणि त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू चमकले... सर्वांना खूप आनंद झाला... चौघांनाही थोड्यावेळ आधी डायरी बद्दल लागून होती ती उत्सुकता लोप पावली... त्यांना त्यावेळी आधी काय चाललं होतं याचा पूर्णपणे विसर पडला... पण त्यात त्यांचा काहीएक दोष नाही

तर हा आपला स्वभावविशेष आहे की आनंदाच्या क्षणी आपण सारं काही विसरून त्याक्षणी झालेला आनंद उपभोगतो... क्षणिक सुखाकडे आपली धाव असते...

सर्व एकाच ठिकाणी जमलेले... बरं झालं सगळं कसं व्यवस्थित पार पडलं, दैवाने साथ दिली, तो पाठीशी असला की बस, मग कोणतीच भीती नाही. असं त्याचे आईवडील बोलत होते. आता कुमारला भेटता येईल, त्याच्याशी बोलता येईल असे म्हणत गप्पा सुरु होत शांतता नाहीशी झाली...

...

तर इकडे ती तिच्या शहरात पोहोचली तेव्हा बराच वेळ झाला होता... ती बसमधून उतरून घरी जातेवेळी रस्त्याच्या कडेला दिवे लागले होते, तिने मोबाईल मध्ये किती वाजले ते पाहिले तर ७:३० वाजलेले... तिने मोबाईल परत हँडबॅगमध्ये ठेवला तर हाताला काहीतरी लागल्याचं तिला जाणवलं पण तिला घाई असल्यामुळे तिने त्याकडे दुर्लक्ष करून ती पटापट पावलं उचलत घरी जात होती, काही मिनिटांतच ती घरी पोहोचली... पण कुमारला त्या अवस्थेत पाहुन तिचं मन सारखं त्याच्या विचारांत गुंतलं होतं... ती घरी आल्यावर, तो ठीक असेल काय? त्याची काय हि अवस्था झाली? या प्रश्नांनी तिला हेरलं... कामात ती स्वतःला व्यस्त ठेवू पाहत होती पण मन मानत नव्हतं... सारखा त्याचा चेहरा डोळयासमोर येत होता... लग्न होऊन चार वर्षे झाली आणि सुखी संसार तिला लाभला... याचं तिला समाधान वाटत होतं आणि ती संसारात रमली होती... त्यामुळेच बऱ्याच गोष्टींचा तिला विसर पडला होता...

तिच्या मनात विचारांची कालवाकालव सुरु होती. दारावरची बेल वाजली तशी विचारांतून काहीवेळ तिला सुटका मिळाली... ओले झालेले हात पदराला पुसत ती दाराजवळ गेली आणि तिने दार उघडले...

" ओ माय स्वीट हार्ट... "

चेहेऱ्यावर असलेली चिंता व्यक्त न करता ओठांवर हसू आणून... तिने तिच्या पतीला आत या असा नजरेनं इशारा केला...

तो आत आला आणि हात पाय धुवून टॉवेलने पुसून सोफ्यावर बसला... इतक्यात ती चहा घेऊन आली, कप त्याच्या समोर धरून उभी राहिली पण मनात विचार पुन्हा दाटून आले...

तिला असं पाहून तो म्हणाला...

" आज मौन आहे की काय तुझं? "

त्याच्या त्या अनपेक्षित प्रश्नाने ती भानावर आली...

" मौन वगैरे काही नाही, बस असंच "

" बरं बैस जरा समोर... "

" एक मिनिट मी दुसरा कप आणते "

तिने किचनमध्ये जाऊन तिच्यासाठी आणखी एक कप आणला आणि ती त्याच्या समोर बसली... दोघे सोबत चहा घेत गप्पा मारायला लागले पण तिचा काही जास्त प्रतिसाद मिळत नव्हता... मग न राहवून त्याने विषय काढला...

" आधी मला तू माफ कर... मला ठाऊक आहे तू का रागावली आहे ते... "

ती कप बाजूला सारून " तुम्ही माफी का मागत आहात... "

" पहिलं तर तुझा वाढदिवस कालच झाला आणि मी तुला काहीही भेट दिली नाही. दुसरं म्हणजे साधं तुला शुभेच्छा दिल्या नाही... "

आता तिला आठवलं कि काल तिचा वाढदिवस होता आणि कुमारने तिला फोन करून शुभेच्छा दिल्या होत्या... ती पुन्हा विचारात गर्क झाली...

" खरंच मला माफ कर, मी सर्व तयारी केली होती पण तुझ्यासाठी जी भेट मी आणणार होतो ती वेळेवर तयार झाली नव्हती त्यामुळे माझा मूड खराब झाला..."

मग त्यावर ती म्हणाली " काही हरकत नाही मी नाराज नाही तुमच्यावर, मला काहीच वाटलं नाही त्याबद्दल, मला ठाऊक आहे की तुम्ही माझी किती काळजी घेता ते..."

तेव्हा हसतच त्याने तिला म्हटलं " एक गंमत आहे, प्लिज दोन मिनिटं डोळे बंद कर. "

" काय गंम्मत आहे? " म्हणत तिने डोळे बंद केले

त्याने एक छोटी पिशवी सोफ्यावर आणून ठेवली, लाईट बंद केला... " हं आता उघड डोळे... "

तिने डोळे उघडून पाहिलं तर समोर टेबलवर केक ठेवलेला... मेणबत्ती लावलेली... त्याच्या एका हातात गुलाबांच्या फुलांचा गुच्छ आणि दुसऱ्या हातात काहीतरी पाठीमागे लपवून ठेवलेलं... तो गायला लागला...

" हॅप्पी बर्थडे टू यु, माय डिअर वाईफ... "

असं गात त्याने सुंदर नेकलेस डब्यातून बाहेर काढला आणि दोन्ही हातात घेऊन तिच्या समोर भरला... ती हसत हात ओठांवर ठेवून आश्चर्य आणि आनंद व्यक्त करत त्याला

" थँक यु, थँक यु सो मच, माय डिअर... हे असं काही मला अपेक्षित नव्हतं..." म्हणाली...

" आधी घालून तर बघ... कसा दिसतो तुझ्या गळयात मला बघू दे "

" तुम्हीच घाला कि माझ्या गळयात "

नेकलेस तिच्या गळयात घालून... तिला आरश्या समोर नेऊन " आता कुठे हा नेकलेस सुंदर दिसत आहे "

स्वतःला त्याच्यासमोर आरश्यात पाहून ती लाजली... खरंच खूप छान आहे, खूप सुंदर ती म्हणाली, मग थोडा केक चाखून तिने बाकीचा फ्रीज मध्ये ठेवला...

" तुला आवडला ना ! बस, पैसे वसूल झाले... बरं तू जेवण वैगरे बनवलं का? "

" नाही. तुम्ही सांगा काय बनवू? "

" काही हि बनवू नकोस, आपण आज बाहेर जाणार आहोत जेवायला तू पटकन तयार हो, लगेच निघूया... "

ती पटकन तयार होऊन आली. दोघेही बाहेर पडले. बऱ्याच दिवसांनी सोबत बाहेर जेवण झाले. मग आईस्क्रीम घेऊन जरावेळ इकडे तिकडे फिरत ते घरी परत आले तेव्हा १०:३० वाजले होते... काही आवराआवर करून झोपायला जवळपास वेळ झाल्याने अन दिवसभर झालेली दमछाक त्यामुळे तिला लगेच झोप लागली... अचानक आलेल्या त्या क्षणिक सुखाने तिला दिवसभर जे घडलं त्याचा विसर पडला... मन हे असंच आहे जरा दुःख झालं की निराश होणारं, सतत सुखाचा पाठलाग करणारं...

त्याला लवकर ऑफिसला जावं लागत असल्याने ती पहाटेच उठली. काम आटपून तिने अंघोळ केली आणि आधी दोन कप चहा बनवला. त्याने दिलेला नेकलेस ठीक करत तिने त्याला चहा दिला... त्याच्याशी जरावेळ गप्पा मारून ती पुन्हा डबा करायचा म्हणून किचनमध्ये गेली आणि स्वयंपाक बनवायला लागली... काहीवेळात तो तयार होऊन किचनमध्ये आला तिथेच बाजूला खुर्चीवर बसून त्याने थोडं जेवण केलं... तिने डबा हाती दिला आणि तो ऑफिसला निघून गेला... ती काम करण्यात मग्न झाली पण दर पाच दहा मिनिटांनी नकळत ती आरश्यासमोर जाऊन स्वतःला त्यात पाहून तिच्या चेहऱ्याची लाली चढत होती... असं काहीवेळ आरश्या समोर आणि काहीवेळ काम करत १०:०० वाजून गेले... मग पंखा सुरु करुन तिने टी व्ही

सुरु केला... तिला गाणं ऐकावसं वाटत होतं तिने गाण्याचं चॅनल लावलं... तिच्या आवडीचं गाणं लागलं...

" अँखियो के झरोखो से, मैने देखा जो सावरे... तुम दूर नजर आये, बडी दूर नजर आये... "

गाण्याचे बोल सोबतच ती गात होती... इतक्यात तिचा मोबाईल वाजत असल्याचं तिला कळलं, टी व्ही चा आवाज जरा कमी करून तिने मोबाईल हाती घेऊन कानाला लावला...

" हॅलो सुजित बोलत आहे... "

त्याचं नाव ऐकताच तिला कुमारची आठवण झाली... त्याला काल जाऊन भेटल्याचं तिच्या लक्षात आलं, काही क्षणात त्याचा काल पाहिलेला चेहरा तिच्या नजरेसमोर आला... मोबाईल सुरु असल्याचं भान तिला नव्हतं...

" हॅलो... हॅलो... आवाज येत नाही का? " सुजित म्हणाला

भानावर येऊन " हॅलो बोल सुजित... आता ऐकू येत आहे... कसा आहे कुमार? "

" अजून बेशुध्दच आहे, आज सकाळी च ऑपरेशन झालं... व्यवस्थित... "

" मग डॉक्टर काय म्हणाले? "

" लवकर ठीक होईल आणि जवळ जवळ पाच तास झाले की त्याला जाग येईल असं म्हणाले... "

" ठीक झालं. बरं मला कॉल करून सांगशील मग तो कसा आहे ते... "

" हो सांगतो ना, बरं मला एक विचारायचं होतं...? "

" हं विचार ना... काय म्हणतोस? "

" काल चुकून तुझ्या बॅगमध्ये एक बुक टाकलं होतं तुला मिळालं का ते...?"

" नाही, मला तर माझ्या बॅगमध्ये कोणतंच बुक नाही दिसलं ... "

" जास्त महत्वाचं नाही पण असेल तर एकदा पाहून घे आणि मिळालं तर पुन्हा इकडे येतेवेळी सोबत घेऊन ये... "

" बरं ठीक आहे मी बघते माझ्याकडे आहे कि नाही... "

" हो पण आठवणीने बॅग बघ... "

" हो. नक्की, बरं ठेवते मी... "

म्हणत तिने फोन बंद केला आणि ती तिची बॅग शोधू लागली... तिने काल रात्री बाहेर जेवायला जातेवेळी ती हँडबॅग सोबत घेतली असल्याचं तिला आठवलं म्हणून आधी हॉलमध्ये टेबलवर, आजूबाजूला तिने शोधलं... मग टी व्ही बंद करून ती बेडरूम मध्ये गेली आणि कपाट उघडून त्यात कुठे ती हँडबॅग दिसते का ते पाहू लागली पण तिथेही तिला ती बॅग मिळाली नाही. मग बेडच्या आजूबाजूला असेल म्हणून ती तिथं वाकून पाहत होती तिथेसुध्दा तिला बॅग मिळाली नाही मग शेवटी तिने बेडरूम मध्ये इकडे तिकडे नजर फिरवली तर हँडबॅग बाजूलाच एक भिंतीच्या कोपऱ्यात तिला मेकअप साठीचा आरसा दिसला... ज्याला लागूनच एक छोटा टेबल

होता त्यावर ती बॅग ठेवलेली तिला दिसली... मग बॅग हाती घेऊन ती बेडरूम मधून बाहेर हॉलमध्ये आली...

तिने ती हँडबॅग उघडली तर तिचा स्कार्फ तिच्या हाताला लागला, तिने तो स्कार्फ बाहेर काढला तर त्यासोबत काहीसं जड खाडकन फरशीवर आदळलं.  तिने खाली वाकून ते उचललं, हाती घेऊन स्वतःशीच... ' हे तर काही वेगळंच एखाद्या डायरीसारखं दिसत आहे सुजित तर बुक म्हणत होता हे ते नसेल कदाचित... पण हे आहे तरी काय...? ' म्हणत तिने अंगठ्याने त्या डायरीचे पान झरझर नजरेआड केले तेव्हा त्यात काहीतरी लिहिलं आहे, तिला दिसून आलं... मग पहिलं जाड कवर बाजूला सारून तिने पान बदललं तर ते पाहून तिने आधी बॅग उचलून टेबलवर ठेवली, डायरीच्या पहिल्याच पानावर गर्द लाल रंगाने

**"मला काही सांगाचंय"**

असं मोत्यासारख्या सुंदर अक्षरात एखाद्या पुस्तकाचं नाव लिहावं तसं लिहलं होतं...

ती सोफ्यावर बसून ते अक्षर ओळखीचं वाटलं म्हणून... ' किती सुंदर लिहिलं ! किती छान अक्षरं आहेत ! हे अक्षर याआधी सुध्दा मी पाहिलं आहे पण कुठे? ' आठवण घेत  तिने स्वतःलाच प्रश्न विचारला... पण काहीही आठवत नसल्याने तिने ते पान बाजूला सारून ती पुढचं पान वाचायला लागली...

"जीवनात खूप काही बघायचं बाकी आहे आणि खूप काही मिळवायचं बाकी आहे, शिकून मोठ्ठ व्हायच आहे असं मी ठरवलं होतं, मला जन्म दिला, माझे पालन पोषण केलं, मला शिकता यावं यासाठीे कष्ट घेतले... त्या आई वडिलांना सुखात ठेवायचं असं खुपकाही स्वप्न मी पाहिली होती. बालपणापासून मीही बरेच चांगले वाईट अनुभव घेतले आणि आलेल्या संकटांना तोंड देत समोर जात होतो, आज एका गोष्टीचा आनंद आहे पैसा जरी नसला जवळ तरी दोस्त खूप मिळवले. अगदी जिवलग मित्र मिळाले या नश्वर जीवनात, मला जवळपास सर्वांची गुपितं माहीत होती ते स्वतःहून मला सांगायचे त्याच कारण मला कधीच कळलं नाही...

आज खंत याचीच वाटते आहे कि जेव्हा मला गरज आहे आधाराची तर मी कुणालाही माझ्या मनातलं सांगू शकत नाही, इतकं एकटेपण वाटेला येईल आणि स्वतः बद्दल असं काही लिहण्याची वेळ मजवर येईल असं मला वाटलं नव्हतं. आज माझे मन इतके जड झाले आहे की शब्द बनून भावना व्यक्त करणं अशक्य झाले आहे... आणि त्याचसाठी मला पुःन्हा सगळं एकदा सुरुवातीपासून तर आतापर्यंत घडलेलं शब्दांत मांडून जगायचं आहे... या निमित्तानं सर्वकाही आठवून का हि वेळ यावी? या प्रश्नाच उत्तरं मिळवायचं आहे... जीवनातील साऱ्या आठवणी मोत्यासारख्या या पेन आणि कागदाच्या मिलनातून एका दोरात ओवायच्या आहेत... ......

## १९. स्मृति

ती एक एक पान बाजूला सारत वाचत होती... तोच तिला ते अक्षर कुमारचं असल्याचं लक्षात आलं... तसं समोर आणखी काय लिहिलं असेल? स्वतःलाच विचारत तिने पान सरकविले... पानाच्या मधोमध लिहिलं होतं...

मराठी शायरीकार माननीय भाऊसाहेब वा. वा. पाटणकर यांच्या ओळी आठवल्या, त्यात जरा भर घालून मन मोकळं लिहायला सुरुवात करतो...

" आजवर इतक्याचसाठी नव्हती आसवं गाळली ।

गाळायची होती अशी, की नसतील कोणी गाळली ।

आसवांच्या या धनाला जाणून मी सांभाळिले ।

आज या विरहाक्षणी यांनीच मला सांभाळिले ।"

जरावेळ विचार करत तिने ते पान बाजूला केलं... वाचायला लागली...

*तो दिवस मला आजही आठवण आहे... दहावीचे वर्ष... मी परीक्षा पास झालो होतो, मला ७५. ०० % गुण मिळाले होते... आतापर्यंत आमच्या वस्तीत कुणालाही इतके टक्के मिळाले नव्हते म्हणून सर्व माझं कौतुक करत होते... पाठ थोपटून वाहवा करत होते मी स्मित हास्य देत त्यांचा आशीर्वाद घेत होतो... त्यादिवशी सकाळपासून वेळ कशी निघून गेली कळलं नाही...*

*मी खूप खुश होतो, दहावी पहिल्याच दणक्यात पास झालो आणि चांगले टक्के मिळाले म्हणून... घरी सगळयांना भेटून झाल्यावर मी माझी आवडती सायकल घेऊन मित्रांना भेटायला निघालो, सायकल चालवत वस्तीतून बाहेर पडलो तर अचानक ती नजरेस पडली... ती काही वर्ष्याआधी येथे कुटुंबासह राहायला आली होती... तिला पहिल्यांदा पाहिलं तेव्हापासून मला तिच्याशी मैत्री करावी असं वाटायचं... पण कधीच तिच्याशी एका शब्दाने बोलायला जमलं नाही... रोज तिच्या घरासमोरून जातांनी तिच्या नकळत तिला बघून निघून जायचं असा दिनक्रम सुरु होता, म्हणून रोजच्या सवयीला आहारी जाऊन एक नजर तिला पाहत मी समोर जायला लागलो पण त्यादिवशी तिने स्वतःहून मला हाक दिली. माझं नाव जेव्हा तिने उच्चारले तेव्हा नुसतं माझं नाव तिच्या तोंडून ऐकल्याने अंगावर जणू काही मोरपीस फिरवलं असं वाटलं... मी जागेवरच सायकल उभी करून खरंच तिने मला हाक दिली याची खात्री करत हळूच मागे वळून पाहिलं तर तोवर ती माझ्या जवळ आली आणि हात समोर करत म्हणाली... " अभिनंदन कुमार, तु दहावी पास झाला त्याबद्दल "*

*मी इतक्या जवळून तिला पहिल्यांदाच पाहत होतो, जरावेळ भान हरपून तिला तसाच पाहत उभा राहिलो... मग तिनेच आवाज दिला तेव्हा तिचा हात हाती घेऊन तिला नुसतंच " थँक्स " म्हणालो...*

*" माझी आई सांगत होती की तुला ७५ टक्के गुण मिळाले म्हणून... "*

*त्यावर हसऱ्या चेहऱ्याने मान हलवून मी तिला हो म्हटलं... आधीच तिला पाहून नेमकं काय आणि कस बोलावं ते सुचत नव्हतं. त्यात इतक्या दिवसापासून मनात तिच्याशी मैत्री करावी अशी इच्छा असून स्वतःहून कधीच बोललो नाही. आज ती अचानक माझ्याशी बोलत आहे हे खरं वाटत नव्हतं. तिने आणखी काही बोलावं असं वाटत होतं...*

*" तु जरा घाईत दिसतो... " ती म्हणाली*

*काय बोलावं कळलं नाही आणि पुन्हा एकदा " हो " म्हणून मी मनातच चूक झाली असं बडबडलो*

*" ठीक आहे, पुन्हा एकदा अभिनंदन... " म्हणत ती घरात जायला लागली तिला थांबवावं असं वाटत होतं पण मी तिला काहीही बोलू शकलो नाही... मग काय नाईलाजाने हसत सायकल चालवत निघालो, मनात आनंद मावत नव्हता कुणाला एकदाच सांगून टाकतो असं झालं होतं... काही अंतर समोर जात लगेच सायकल परत मागे फिरवून दुसऱ्या गल्लीतून घरी आलो. सायकल अंगणात उभी करून धावतच त्याला सांगायला निघालो... तो म्हणजे माझा जिवलग मित्र, तेव्हा माझा सर्वांत जवळचा मित्र होता " कबीर ", माझ्या घरापासून दोन तीन शेत दूर त्याचा निवास होता. दोन्ही बाजूला शेत असल्याने तेथून बैलगाडी जात असे, त्यामुळे मध्ये गवत वाढलेलं आणि दोन सारखे पट्टे असणारा रस्ता तयार झाला होता. मी सुसाट धावत जाऊन त्याच्याजवळ पोहचलो... आनंदाच्या भरात मी धापा टाकत त्याला हाक दिली...*

" कबीर, कबीर... आज मी खूप खुश आहे... मनात मावणार नाही इतका आनंद झाला आज... "

त्याने जणू इशारा करतच मला विचारले, कशाचा झाला इतका आनंद तुला?

तो माझा जिवलग मित्र, मी त्याचा इशारा लगेच समजलो आणि त्याला म्हणालो... " अरे ती माझ्याशी बोलली आज, मला तिने अभिनंदन केलं... "

तुला कळलं नाही का? सॉरी, सॉरी... मी तुला सांगायला विसरलो तिच्या नादात. अरे आज माझा निकाल लागला ना, मी पास झालो म्हणून तिने मला शुभेच्छा दिल्या... कळलं आता...

त्याने इशारा करत पुन्हा विचारलं, ती म्हणजे कोण...?

मी लगेच त्याला म्हणालो, अरे तुला सांगितलं होतं ना, एक कुटुंब आलं आहे माझ्या वस्तीत राहायला, त्यांची मुलगी... जिच्याशी मला मैत्री करायची होती, तुला तिचं नावसुद्धा मी सांगितलं होतं... तू विसरला वाटतं... बरं पुन्हा सांगतो, तिचं नाव आहे... " कितीप्रिया "... हे सगळं त्याला सांगितलं मग कुठे मन जरा शांत झालं, तिचं नाव ओठावर येताच अंगावर रोमांच उभे राहिले... हृदयाची धडधड अचानक वाढली. कळत नव्हतं असं का होतं आहे मग मी बाजूलाच त्याला टेकून खाली बसलो. आजूबाजूला माणूस म्हणून कुणी नव्हतं, पाखरांची किलबिल सोडली तर सगळीकडे नीरव शांतता होती... मी डोळे मिटून तो क्षण पुन्हा पुन्हा आठवून तिचा सहवास

अनुभवत होतो... मध्येच वाऱ्याची झुळूक थंडगार स्पर्श करून जात होती... कबीर तसाच शांत होता , म्हणूनच तो माझा जिवलग मित्र होता...

त्याच्याशी माझी अशीच नकळत मैत्री झाली, तेव्हा मी सातवीच्या वर्गात शिकत होतो, सकाळची शाळा होती... मग शाळा सुटली कि घरी आल्यावर दिवसभर खेळायचं हाच एक छंद होता आणि संध्याकाळी वाचनालयात जाऊन पुस्तक वाचायचं असा काहीसा वेळ मजेत जात होता... एकदा मी दुपारी शाळेतून घरी आल्यावर शेतात पीक नसल्याने तिथे पतंग उडवीत होतो, मजा येत होती तसा मीही आणखी ढील देत होतो... पतंग खूप दूर उंचावर गेले आणि अचानक वावटळ आल्याने धागा तुटला, पतंग सैरावैरा भिरभिरत जात होते. मी धावतच मागे मागे जात होतो, वावटळ थांबली तसा वाऱ्याचा जोर कमी झाला, पतंग खाली येऊन एक झाडाच्या फांदीला लटकले... मी धावतच तिथं पोहोचलो. जवळ जाऊन पाहतो तर भलंमोठं खोड असणार पिंपळाचे झाडं, मी मोठ्या हिंमतीने वर चढून पतंग काढले... हळूहळू खाली उतरलो, घामाने चिंब झालो होतो आणि जरा दमलो होतो. मग मी त्या विशाल, थंडगार झाडाच्या सावलीत जरावेळ विसावलो. पतंग कुठेही फाटलं नव्हतं, बाबांनी आजच मला ते पतंग घेऊन दिलेलं... म्हणून मला ते गमावणं शक्य नव्हतं, मनात विचार आला की या झाडांमुळे मला माझं पतंग परत मिळालं... मी बराचवेळ तिथं बसून होतो, त्याच्या सहवासात मी रमलो.

दुसऱ्या दिवशी मी स्वतः त्या झाडाजवळ पतंग उडवायला गेलो आणि रोजच जायला लागलो... माझी त्याच्याशी गट्टी जमली आणि एकेदिवशी त्याला टेकून बसलो होतो, कबीरांचे दोहे वाचत असताना मनात विचार आला की जसे कबीर मोलाचं ज्ञान देऊन जगणं शिकवतात, अधीर मनाला आधार देतात तसंच काहीसं हे झाडं मला नवी ऊर्जा, उमेद आणि मनाला शांती देतं म्हणून मी मित्र या नात्याने त्याच " कबीर " असं नामकरण केलं... आम्ही दोस्त झालो. पुस्तक आणि कबीर यांचा सहवास मला हवाहवासा वाटायचा, म्हणून मी बरेचदा पुस्तक वाचायला तिथं जात होतो, एकाचवेळी दोघांना भेटत होतो... कधी कबीरशी गप्पा मारत होतो तर कधी पुस्तकांशी... मग काही दिवसांनी ती माझ्या वस्तीत राहायला आली... तेथून जणू एक नवीन पर्व सुरु झालं. तिला पाहिलं तेव्हापासूनच तिच्याबद्दल एक वेगळंच आकर्षण मला जाणवायचं... मी तिला बघायचा बहाणा शोधत फिरायचो, पण जेव्हा जेव्हा तिला पाहायचं ठरवलं तेव्हा तेव्हा ती एक नजर सुध्दा दिसायची नाही पण मनात तिचा काहीएक विचार नसतांना, जरा घाई असतांना असच  बाहेर पडलो कि ती नजरेसमोर आलीच समजा, मी पार गोंधळून जात असे...

तिच्याशी दुसऱ्यांदा भेट झाली तो दिवस... मी आणि माझ्या मित्रांनी ऍडमिशन बद्दल आज माहिती मिळवून लगेच कॉलेज निवडायचं

ठरवलं होतं, सर्व मित्र एकाच कॉलेजला आणि एकाच वर्गात प्रवेश घेऊ असं ठरवून होतो. मी कॉलेजला ऍडमिशन करायची म्हणून शाळा सोडल्याचा दाखला आणि मार्कशीट आणायची करिता गडबडीने निघालो होतो, आधीच उशीर झालेला... मग काय घरूनच सायकल जोरात चालवत निघालो. तर ती तिच्या घराच्या अंगणात समोरच हजर, मी येत असल्याचे दिसून तिने हसत मला पाहिले. मग काय मी सायकल हळू चालवत समोर जात होतो. मनात वाटलं कोणत्या वेळेला हि दिसते आहे? थांबून हिच्याशी आज बोलावं का कि मला तुझ्याशी मैत्री करायची आहे?

मनात काय चाललं होतं काही उमजत नव्हतं, अन तिने आवाज दिला...

" कुमार... "

मी जरा गोंधळून तिच्याकडे पाहिलं " काय म्हणतेस? "

" जरा थांबशील, तुला घाई नसेल तर "

सायकल थांबवून मी एक पाय खाली टेकवून... " काय झालं? "

" तुझ्याशी जरा बोलायचं होतं... "

मनाला विश्वास बसत नव्हता कि ती बोलत आहे...

" काय? काय  बोलायचं आहे तुला? "

" तुझे पुस्तक आणि नोट्स असतील ना? कि तू दिले कुणाला? "

*" नाही अजून कुणाला दिले नाहीत. का बरं? "*

*" मला हवे होते, मी दहावीला आहे ना यावर्षी "*

*" हे बोलायचं होतं तुला, मी आत्ता शाळेत जात आहे, परत आल्यावर मी तुला आणून देतो, ठीक आहे... "*

*त्यावर हसू ओठावर आणत तिने " चालेल " असं म्हटलं आणि मी शाळेत जायला निघालो... मन अगदी काठोकाठ तलाव भरावा तसं आनंदाने भरलं होत. मी दिवसभर खूप आनंदात होतो की तिला आज सकाळी तर भेटलोच आणि पुस्तक द्यायला जायचं आहे तेव्हा पुन्हा एकदा भेटता येईल. दोन भेटीतच ती मनमिळाऊ असल्याचं समजलं आणि मी कितीतरी दिवस तिच्याशी बोलु शकलो नाही याचं मला नवल वाटलं, तिने मात्र किती सहजपणे तिचं मनातलं बोलून दाखवलं... शाळेतून परत यायला उशीर झाला होता पण घरी आल्यावर पटकन हातपाय धुवून मी सर्व पुस्तक आणि नोट्स एकदा नीट आहे की नाही ते पाहिलं.*

*ते सोबत घेऊन तिच्या दाराजवळ पोहोचलो, तिच्या घरी जायची माझी पहिलीच वेळ होती... दार उघडच होतं , मी दारावर थाप मारणार इतक्यात ती समोर हजर झाली आणि मी हात मागे घेऊन तिच्याकडे पाहत...*

*" किर्तीप्रिया, मी पुस्तक घेऊन आलो... "*

*" अरे उद्या सकाळी आणले असते तरी चाललं असतं... "*

" मला वाटलं आताच देऊन यावं म्हणून मी घेऊन आलो... "

" बरं, ठीक आहे आणले आहेस तर दे, तू ये ना आत, असा बाहेर का उभा आहेस...? "

मनात होतं की तिच्याशी जरावेळ बोलत बसावं पण अंधार पडायला सुरुवात झाली होती आणि तिच्या घरी यावेळी बसून गप्पा मारत बसणं ठीक नाही असं वाटलं म्हणून...

" नाही आज नको, हे पुस्तक घे आधी हवं तर उद्या भेटू "

" अरे ये ना आत, जाशील थोड्या वेळाने घरी... "

" नाही राहू दे आज, येतो मी " म्हणत मी परत जायला लागलो

" बरं ठीक आहे, भेटू उद्या " ती म्हणाली

" ठीक आहे " म्हणत मी तिथून निघालो... घरी आलो पण मनात ती अजून तशीच जणू माझ्याशी बोलत होती असं राहून राहून वाटत होतं... रात्री जेवण झाल्यावर मी बाहेर अंगणात बिछान्यावर आडवा झालो, उन्हाळ्यात रात्री गार वारा असल्याने आम्ही सर्व बाहेरच झोपायचो... एरवी अंग टाकताच झोप लागत होती पण आज मात्र बराच वेळ झाला तरी डोळा लागत नव्हता तिचा चेहरा सारखा डोळ्यासमोर येत होता... ती आज सकाळी जे काय बोलली ते सारं आठवत होत, पुस्तक दिले त्यावेळी ती जशी हावभाव आणून माझ्याशी बोलली तेव्हाची ती ' किर्तीप्रिया ' मला जणू समोर उभी आहे असं भासत होत... कितीतरी वेळ मी तशाच पडून

*आकाशातील चंद्र, चांदण्या पाहत राहिलो, एक वेळ अशी आली कि डोळे जड व्हायला लागले आणि मला केव्हा झोप लागली मला कळलं नाही...*

*दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून तयार झालो. अकरावी ला प्रवेश करायचा म्हणून घरून लवकर निघालो, तिच्याशी मैत्री झाली होती आणि एक नवीन उत्साह मी अनुभवत होतो. घरातून बाहेर पडलो तेव्हा वाटलं की वाटेत ती दिसायला पाहिजे, का? हे काही मला कळलं नाही... पण जातेवेळी ती दिसली नाही, जरा निराश झालो... कॉलेजला पोहेचेपर्यंत... तिथे गेल्यानंतर प्रवेशपत्र जमा करून माझा प्रवेश निश्चित होईपर्यंत मी जरा काळजीत होतो, दिवसभर लांबच लांब रांगेत उभं राहून अखेर मी अकरावीला प्रवेश मिळवला त्या आनंदात मी सायकल चालवत घरी जायला निघालो... दिवसभर कॉलेजमध्ये असताना मनात बऱ्याच गोष्टी सुरु होत्या, नवीन वातावरण आणि प्रवेश घ्यायची गडबड सुरु असल्याने दिवसभर तिचा विचार मनात आला नाही... सायकल चालवत मी गावात पोहोचलो, माझ्या घराकडे जाणाऱ्या रस्त्याने जात असता अचानक ती समोर दिसली... मी सायकलचा वेग कमी केला, तिच्याशी जरा बोलावं असं वाटलं म्हणून मीच स्वतःहून सायकल बाजूला घेत तिच्या अंगणात थांबलो... ती तिच्या घराच्या पायरीवर, दोन पाय खालच्या पायरीवर ठेवून, एक हात चेहऱ्याला लावून, तर दुसरा हात दोन्ही पायांच्या गुडघ्यावर आडवा ठेवून बसलेली होती, मी तिथं थांबल्याचं तिच्या लक्षात आलं नाही असं मला वाटलं म्हणून मीच तिला आवाज दिला...*

*" किर्तीप्रिया... "*

*बहुदा कसलातरी विचार ती करत होती, मी आवाज दिला तेव्हा तिने माझ्याकडे नजर फिरवली...*

*" कुमार... माझं लक्ष नव्हतं, कधी आलास? "*

*" आत्ताच, पण तू कशाचा इतका विचार करत होती? "*

*" अरे काही नाही... कुठे गेला होता? "*

*" कॉलेजला, अकरावीला प्रवेश घेतला आज... "*

*" छान, वेळेला मानतो बाकी तू... हे आहे तुझ्या यशाचं रहस्य... "*

*" नाही तसं काही नाही, मला आवडत वेळेत काम करायला... "*

*त्यावर हलकेच हसत तिने सहमत असल्याचं दाखवलं...*

*" आणि मला तुझ्या नोट्स खूप आवडल्या, अक्षर सुध्दा छान आहे हं तुझं..."*

*त्यावर " धन्यवाद ! " इतकंच मी बोलू शकलो, तिच्याकडे पाहत असता काय बोलाव ते सुचत नव्हतं पण तिच्या स्तुतीने खरंच मन प्रसन्न झालं...*

*" तुझ्या पुस्तक आणि नोट्स पाहून तु खूप मेहनती आहे असं वाटलं... "*

*" बस आता जरा जास्त होतं आहे... "*

*" मी काही गंमत म्हणून नाही म्हणत आहे मला जे वाटलं ते मी तुला बोलून दाखवलं बस्स... "*

*" पुन्हा धन्यवाद, आता निघतो मी... "*

*" ठीक आहे पण मी मस्करी म्हणून नाही बोलले... "*

*त्यावर नुसतंच तिच्याकडे एक नजर पाहून मी मानेनेच होकार देत सायकल काढली आणि घरी जायला निघालो... पण का कुणास ठाऊक मला मागे वळून पाहावंस वाटलं तर ती अजून मला बघत असल्याचं दिसून आलं... मी तिच्याकडे बघतच राहिलो आणि रस्त्याच्या बाजूला जाऊन एका खांबाला धडकलो... मी उठून उभा झालो, आजूबाजूला कुणीही नव्हतं तेवढं बरं झालं नाहीतर माझा चांगलाच हशा झाला असता... मी कपडे झटकून सायकल उचलणार तोच ती माझ्या बाजूला उभी राहून...*

*" कुमार... कसा काय पडला? तुला लागलं तर नाही ना? "*

*" नाही , मी ठीक आहे... "*

*असं म्हणत मी सायकल उचलून जायला लागलो तर पायाला लागलेलं तिच्या लक्षात आलं...*

*" अरे नाही काय म्हणतोस हे बघ रक्त चाललं आहे पायातून आणि हाताला पण खरचटलं... "*

*" काही नाही होत, तू जा घरी... मी घरी जाऊन करतो मलमपट्टी त्यावर..."*

*" बरं नीट जा... "*

*मी पायी चालत घरी जायला लागलो पण ती अजून तिथेच थांबलेली होती... मी घरी आल्यावर जखम कपड्याने पुसून त्यावर हळदीचा लेप लावला... जरावेळ आराम करावा म्हणून अंग टाकलं, तर तिचा चेहरा नजरेसमोर येत होता... नेमकं काय चाललं होतं ते मला काहीएक कळत नव्हतं... ती जेव्हा मला लागलं त्यावेळी माझ्यासोबत बोलत होती तेव्हा जणूं तिच्या बोलण्यात एक आपुलकी मला जाणवली... तिचं मनमोकळं बोलणं मला खूप आवडलं होत, ती बोलत असताना तिच्याकडे बघत राहावंसं वाटायचं, तिचा सहवास हवाहवासा वाटत होता पण का?? याचं उत्तर मला मिळत नव्हतं... हात आणि पायाच्या वेदना आता जाणवत होत्या. मी तसाच पडून होतो...*

*हात आणि पायाची जखम बरी व्हायला तीन चार दिवस लागले... त्यामुळे सायकल घेऊन फिरवायला बाहेर गेलो नाही, पायी पायी कबीर जवळ मात्र रोजच जात होतो, त्याच्या सहवासात वेदनांची जाणीव जरा कमी व्हायची... मी तिथं जाऊन पुस्तक वाचत बसायचो मध्येच तिचा विचार मनात आला की कबीरला तिच्याबद्दल सांगून मन मोकळं करत होतो... कॉलेज सुरु व्हायला अजून वेळ होता म्हणून वाचनालयात असलेली नावाजलेली बरीच पुस्तक वाचून काढावी असं ठरवलं... सर्व मस्त चाललं होतं...*

जवळपास एक आठवडा मला त्रास सहन करावा लागला, मला बरं वाटायला लागलं... मग काय, दुसऱ्याच दिवशी सायकल घेऊन जरा वेळ फेरफटका मारून यावा म्हणून घरून निघालो... त्या सात आठ दिवस सुजितला भेटलो नव्हतो म्हणून सरळ त्याच्याघरी गेलो त्यानेही माझ्यासोबतच अकरावीला प्रवेश घेतला होता... तसं आमचं आधीच ठरलं होतं... मग नवीन कॉलेज बद्दल आणि इतर गप्पागोष्टी करत बराच वेळ निघून गेला... पहिल्या दिवशी सोबतच कॉलेजला जायचं असं ठरवून मी त्याचा निरोप घेतला अन मी घरी परत जायला निघालो... तर ती वाटेत भेटली, यावेळी तिनेच मला थांबवलं... मी सायकल वरून खाली न उतरताच सवयीने एक पाय खाली टेकवून तिच्याजवळ सायकल उभी केली. तिचा पहिला प्रश्न...

" कसा आहेस कुमार? म्हणजे पायाला त्यादिवशी लागलं होतं ना, आता ठीक आहे ना...? "

मला वाटलं होतं की तिला या गोष्टीचा विसर पडला असावा... " हो, मी ठीक आहे "

" पण त्यादिवशी तू अचानक कसा पडला? "

मी विचार करत होतो की आता हिला कसं सांगावं कि तिच्याकडे पाहत असताना मी खांबाला धडकलो म्हणून...

" रस्त्यात मोठा दगड होता, त्याला चुकवायला गेलो तर माझा तोल गेला आणि मी पडलो... "

" असं झालं तर... "

त्यावर मी मानेनेच होकार दिला...

ती आणखी काही विचारणार म्हणून मी तिला " येतो मी " म्हणत पायाने सायकल पुढे लोटत तेथून निघालो... घरी परत आलो...

दहा पंधरा दिवस गेले आणि माझं कॉलेज सुरु झालं. सर्वकाही नवीन वाटतं होतं, कॉलेज, शिक्षक, सारं सारं अगदी एका वेगळ्या दुनियेसारखं मला भासत होतं... नवे मित्र जुळायला जरा वेळ लागला अन संपूर्ण दिवस कॉलेज मध्ये निघून जायचा... त्यामुळे एक दोन दिवसाआड तर कधी कधी सुटीचा दिवस रविवार आला की स्वतःहून तिला भेटायला म्हणून जात होतो, कॉलेजच्या गमती जमती सांगत बसायचो... आमची कोणत्या कोणत्या निमित्ताने भेट व्हायची, बोलणं व्हायचं... दिवसामागून दिवस जात होते, जीवन कितीतरी पटीने सुंदर होत चाललं होतं आणि आमची मैत्री आणखी घट्ट होत होती... तसे सारे दिवस सारखेच पण सणासुदीचे आणि सुटीचे दिवस सर्वांना आवडतात. त्या निमित्ताने सर्व परिवार वेगळाच आनंद अनुभवत असतो आणि मैत्रीचे बंध आणखी घट्ट होत असत... तसंच काहीसं आमच्या मैत्रीत घडत होतं...

या सर्व गोष्टी इतक्या लवकर आणि झपाट्याने घडत होत्या कि ते वर्ष कधी संपलं कळलं नाही... नवीन वर्षाला सुरुवात झाली, इतरांना

शुभेच्छा दिल्या तश्याच तिच्या घरी जाऊन तिलाही दिल्या... त्यांनंतर तिच्या घरी जाणं येणं अगदी एक रोजची सवय झाली होती...

तेव्हा नवीन पर्वाला सुरुवात झाली होती, तीच दहावीचे वर्ष, सराव परीक्षा सुरु होणार होती... तिने तिच्या अभ्यासात मदत करशील म्हणून मला विचारलं तर मी लगेच होकार देऊन टाकला आणि मी जमेल तितकी मदत तिला करत होतो... सराव परीक्षा पार पडली, इकडे माझे कॉलेजचे गृहपाठ सबमिट करायला सुरुवात झाली होती. काही दिवस गेले आणि दहावीची बोर्ड परीक्षा सुरु झाली, मी रोज न चुकता तिला बेस्ट ऑफ लक विश करत होतो, तर ती पेपर देऊन परत आल्यावर पेपर कसा गेला ते विचारायला सुध्दा...

परीक्षा संपली होती... दहावी आणि पाठोपाठ अकरावी अशा दोन्ही... शाळा आणि कॉलेजला किमान दोन महिने सुटी होती, मग काय सकाळी लवकर उठून तयार झालो कि खेळायला, खेळून दमलो कि आंबे, संत्री, चिंचा तोडायला सगळे मित्र मिळून जात होतो... दुपारी कबीरच्या सहवासात पुस्तकाचे वाचन आणि संध्याकाळी सायकल फिरवायला निघालो की तिच्याशी गप्पा... असे मजेत सुटीचे जात होते... अन तो दिवस उगवला, दहावीचा निकाल लागला... मी सायकल घेऊन सुजीतकडे जात होतो तर ती बाहेर अंगणात होतीच. मी जरा लक्ष नाही असं दाखवत समोर जात होतो तर तिने मला आवाज दिला...

"कुमार... कुमार... "

*मी सायकल बाजूला घेत " कितींप्रिया... "*

*" तुला  घाई असेल तर जा नंतर भेटू... "*

*" बोल ना "*

*" थांब हा, आलेच मी " म्हणत ती घरात गेली आणि हातात पेढ्यांचा डबा घेऊन आली... दोन पेढे मला देत*

*" कुमार पेढे घे "*

*" पेढे...? प्रसाद आहे का? "*

*" अरे तुला ठाऊक नाही वाटते, माझा निकाल लागला आज, मी पास झाले"*

*" वाह अभिनंदन " हातात हात मिळवत मी तिला शुभेच्छा दिल्या... " पण दोन पेढे का बरं? "*

*" तू मला अभ्यास करताना मदत केली ना म्हणून... "*

*" ठीक आहे " म्हणत मी त्यातला एक पेढा तोंडात टाकला... जरावेळ काहीच बोललो नाही...*

*न राहवून ती म्हणाली " तु मला किती टक्के मिळाले विचारलं नाही... "*

मी एक क्षण वाया न घालता लगेच... " ६४ पॉईंट काहीतरी... % " इतकं बोलून थांबलो, दुसरा पेढा खात सायकल वरून खाली उतरून, स्टँडवर लावायच्या बहाण्याने नजर चुकवत मी पाठमोरा उभा राहिलो...

नकळत बोलून तर टाकलं... पण आता काय होणार म्हणून मी हळूच वर नजर केली तर तिचा चेहरा बघण्यासारखा होता... डोळे किंचित मोठे झालेले, भुवया उंचावलेल्या, एक हात कमरेवर ठेवून तर दुसरा हात हनुवटीला लावून ती माझ्याकडे पाहत होती... काही क्षण ती तशीच उभी होती... भानावर येऊन

" तुला कसं माहित...? मी तर फक्त घरी सांगितलं मला किती टक्के मिळाले ते... "

मनात विचार करत, आता काय बोलावं? अन पटकन तिच्या कडे नजर वळवून " खरं कि काय? ६४ % मिळाले तुला? मी तर  सहज गंमत म्हणून  बोललो..."

पण तिला ते पटलं नाही हे माझ्या लक्षात आलं तरी  मला तिचे टक्के माहित नाही असं दाखवत तिच्याकडे पाहत होतो... ती काहीएक बोलली नाही तेव्हा मीच तिला विचारलं...

" सॉरी हं, बरं सांग किती टक्के मिळाले? "

दोन्ही हातांची घडी घालून " ६५ % "

" अरे वा ! पुन्हा एकदा, अभिनंदन "

*" धन्यवाद... पण... "*

*त्यावर ती काही बोलणार इतक्यात...*

*" बरं येतो मी, जरा काम आहे... " म्हणत मी तेथून निघालो, म्हणजे मी तेथून पळ काढला... मला ठाऊक होतं की तिचं माझ्या उत्तराने समाधान झालं नाही.*

*त्याचं असं झालं की मला आधीच माहिती होतं की उद्या निकाल लागणार... दुपारी बारा वाजता निकाल वेबसाइट वर पाहता येणार होता. मी ११.३० वाजताच इंटरनेट कॅफेत हजेरी लावली होती... तिच्या आधी मी तिचा निकाल कॉम्पुटर वर पाहिला होता, तिला ६४.७८ % मिळाले होते आणि तिचा रोल नंबर, एकदा तिच्याशी बोलत असता मी तिच्या नकळत हॉलतिकीट वरचा वाचला होता. दोन तीन वेळा आठवण केला आणि तो नंबर माझ्या लक्षात राहून गेला...*

अचानक तिचा मोबाईल वाजला आणि ती त्या डायरीच्या दुनियेतून वास्तवात परत आली... तिने मोबाईल हाती घेतला तर कस्टमर केयरचा फोन असल्याचं तिला कळलं. " केव्हाही फोन लावतात " स्वतःशीच बोलत कॉल न उचलताच तिने कट केला... तर वाचत असतांना बराच वेळ निघून गेला आणि कामं तशीच खोळंबली आहेत हे तिच्या लक्षात आलं, खरं तर ती डायरी पूर्ण वाचावी असं तिला वाटत होतं पण धुणीभांडी सगळी कामं व्हायची असल्याने तिने मोह आवरता घेतला... डायरी जिथपर्यंत वाचून झाली त्या पानाच्या मधात बोट ठेवून ती बेडरूम

मध्ये गेली, ड्रेसिंग टेबल वर पडलेलं एक विजिटिंग कार्ड उचलून तिने ते डायरीत खूण म्हणून ठेवलं. तिथेच आरश्यासमोर डायरी ठेवून ती कामाला लागली... पटापट काम आवरून कधी एकदा परत डायरी वाचते असं तिला होऊन गेलं...

ती काम फक्त शरीराने करत होती पण तिचं मन मात्र कुमारने जे काय लिहिलं त्यातच गुंतलेलं होतं... मध्येच कितीतरी विचार तिला नकळत परत परत कुमारच्या डायरीत जे काय तिने वाचलं तिकडे भूतकाळाच्या दिशेने घेऊन जात होते... तिला आणखी बेचैन करत होते तर दुसरीकडे एक प्रश्न तिला पडला...

" कुणाला पूर्णपणे समजून घ्यायला हे आयुष्य पुरेसं आहे का...? "

## २०. दिलासा

मनात विचारांचं वादळ उठलेलं, तरी ती कामं करत होती... तिने कपडे धुवून वाळायला दोरीवर टाकले, भांडे स्वच्छ धुवून किचनमध्ये ठेवले... सतत मनात येणारे विचार शरीराला आणखी क्षीण करत होते त्यामुळे रोजच्यापेक्षा काम करायला तिला जास्त वेळ लागला. काम संपवून तिने घामाने चिंब झालेला चेहरा थंडगार पाण्याने धुऊन पदराने पुसला... जरावेळ आराम करावा मग पुन्हा डायरी वाचत बसावं असं मनाशी ठरवून, पंखा सुरु केला आणि ती खुर्चीत बसली... घामाने चिंब झाल्याने तो गार वारा तिला हवाहवासा वाटत होता... तिने केसांची लांब वेणी समोर घेतली... चेहऱ्यावर येणारे केस बाजूला सारले अन मान वर केली... गार वाऱ्याने ती सुखावली. पंख्याचे फिरणारे पाते ती पाहत होती... मनात विचाराचे चक्र सुरूच होते... हळूहळू डोळे जड व्हायला लागले आणि तिने डोळे मिटले...

बंद डोळयासमोर काही चित्र तिला दिसायला लागली... जरा पुसट, काहीशी धूसर... धुकं असलेली पहाट जणू... मग तिला स्पष्ट दिसू लागलं... नजरेसमोरचा देखावा तिला दिसत होता... बेडवर जखमी अवस्थेत कुमार झोपलेला... ती त्याच्या जवळ जाऊन त्याला पाहत आहे असं तिला भासत होतं... तो क्षण आला जेव्हा ती त्याच्या समोर उभी आहे असं तिला वाटलं... त्याचा चेहरा जसा तिने दवाखान्यात पाहिला होता तसाच याक्षणी तिच्या नजरेस आला... ती पुन्हा कुमार आणि त्याने लिहिलेलं आठवून डायरीत पुढं आणखी काय लिहिलं

असेल? ? असा प्रश्न तिला पडला, पुढं जे काय त्याने लिहिलं ते वाचावं या आतुरतेने तिने मिटलेले डोळे उघडले...

ती खुर्चीतून उठली, तिने बेडरूम मध्ये जाऊन डायरी आणली... ती परत येऊन पंख्याखाली खुर्चीवर बसली... तिने खूण म्हणून ठेवलेलं विसीटिंग कार्ड पाहिलं... डायरी जिथं ती वाचतांनी थांबली होती तेथून पुढे ती वाचायला लागली...

कुमारने डायरीत पुढं लिहिलं होतं -----

*ती दहावी उत्तीर्ण झाली तेव्हा मला वाटायचं कि तिने माझ्या कॉलेजला प्रवेश घ्यायला पाहिजे... मी तिला दोन एक दिवसानंतर भेटत होतो... तिच्याशी बोलत होतो... एकदा बोलता बोलता तिने मला विचारलं की, ' उद्याला तू माझ्यासोबत येऊ शकशील का? ? मला माझी मार्कशीट आणि टी. सी. आणायची आहे ' मी तिला हो म्हटलं आणि दुसऱ्या दिवशी आम्ही सोबतच शाळेला जाऊन मार्कशीट आणि टी. सी. घेऊन आलो... त्यादिवशी दोघे बराच वेळ बोलत होतो पण तिला ' तू कोणत्या कॉलेजला प्रवेश घेणार आहे? ' असं विचारणं मला जमलं नाही... निदान तिने तरी मला विचारावं कि ' कोणत्या कॉलेजला प्रवेश करू? ' असंही वाटायचं पण ना मी तिला विचारलं आणि तिने सुध्दा मला नाही विचारलं...*

*कॉलेजला अकरावी करीता प्रवेश घ्यायला सुरुवात झाली होती... माझे बारावीचे वर्ग सुरु व्हायला काही दिवस बाकी होते, मी कॉलेजला*

जायचा प्रश्नच नव्हता... त्यामुळे तिने माझ्या कॉलेजला प्रवेश घेतला असेल का असा विचार मनात आला... मी सायकल घेऊन बाहेर पडलो...

तर ती वाटेतच मला भेटली...

" कुमार कुठे जात आहेस? "

" बस सहज निघालो "

" तुझं कॉलेज सुरु नाही झालं का? "

" नाही, पण का विचारलं? "

" मी तुझ्याच कॉलेजला अकरावीला प्रवेश घेतला ना "

मनातच -- 'अरे वा ! मस्त झालं हे तर '

" हो का? छान केलं... कसं वाटलं कॉलेज...? "

" गर्दी होती ना कॉलेज मध्ये म्हणून कुठे फिरता नाही आलं... "

" ठीक आहे. "

" कधी पासून अकरावीचे वर्ग सुरु होणार आहे? "

" तरी १० -१५ दिवस वेळ आहे... "

" माझे वर्ग सुरु होणार आहेत काही दिवसांनंतर... "

" हो काय? लवकर सुरु होणार आहे "

*मी तिला " हो, येतो मी " म्हणत तिथून निघालो सुजीतकडे गेलो आणि परत येऊन हि बातमी आधी कबीरला सांगितली... मला खूप आनंद झाला होता.*

*माझं कॉलेज सुरु झालं आणि तो दिवस उगवला... तिचा कॉलेजचा पहिला दिवस, तिने आदल्या दिवशीच आपण सोबतच कॉलेजला जाऊया असं मला सांगितलं होतं... किती वाजता घरून निघायचं हे सुध्दा तिने मला सांगितलं होतं... त्यादिवशी मी लवकरच तयार झालो होतो आणि बस आता कॉलेजला जायला निघणार तोच सायकल पंक्चर झालेली मला दिसली... मग काय नाईलाजाने मला तिच्यासोबत जाता आलं नाही... सायकल दुरुस्त करून घ्यायला मला घरीच वेळ झाला. मी पंक्चर बनवून सायकल ठीक केली... मला उशीर झाला होता आणि वर्ग सुरु झाल्यावर कॉलेजला जाणं मला आवडत नव्हतं... मला सायकल वेळेवर पंक्चर झाल्याने दिवसभर घरी राहावं लागलं याचं वाईट वाटलं ...*

*मला ठाऊक होतं की कॉलेजचा पहिला दिवस म्हटलं की लवकर सुटी होणार, म्हणून मी सायकल घेऊन ती आली असेल, तर तिला भेटून यावं आणि कॉलेजचा पहिला दिवस कसा गेला तिला विचारावं... जरावेळ गप्पा मारत बसावं म्हणून घरून निघालो होतो... तिच्या घरासमोरून जात असता*

*ती अजून घरी आली नव्हती म्हणून मीच सरळ शहराच्या दिशेने निघालो... काही अडचण तर आली नाही ना असं मला वाटलं त्यामागे एक कारण होतं...*

*मी भरधाव सायकल चालवत होतो, रोजच्या सवयीने मी १० मिनिटांत कॉलेज समोर पोहोचलो तेव्हा सर्व जण गेटमधून बाहेर येत असल्याचे दिसून आले... मी बाजूला थांबून होतो इतक्यात ती सायकल घेऊन घराकडे जायला निघाली होती, मी तिला काही अंतर समोर जाऊ दिलं आणि दुसऱ्या रस्त्याने सायकल वळवून तिच्या बरोबरीत आलो... तिला मी तिथं अचानक आल्याचं जरा आश्चर्य वाटलं होतं आणि ते तिच्या चेहऱ्यावर मला दिसून आलं होतं...*

*" कुमार... "*

*मी नुसतंच तिच्याकडे पाहिलं...*

*" वाह छान, सकाळी सोबत कॉलेजला जाऊ असं म्हणाला होता आणि आता दिसत आहे, घरी परत जातेवेळी... "*

*" सॉरी, पण वेळेवर सायकल पंक्चर झाली होती तर मी तरी काय करणार... "*

*" हो काय? बरं ठीक आहे मग तू उशिरा आला होतास का? "*

*" नाही, मी कॉलेजला आलोच नाही "*

*" अच्छा... मग आता इकडे कसा आला? "*

*" सायकल दुरुस्त करायची होती ना... "*

" बरोबर आहे... "

" बरं ते जाऊ दे, कसा होता कॉलेजचा पहिला दिवस? ? "

" तसा बरा होता पण एक गडबड झाली आज... "

" काय झालं? "

" ती ही तुझ्यामुळे... "

"माझ्यामुळे? ?? " तिच्याकडे पाहत

" नाहीतर काय, तू सोबत येणार म्हणून मला थोडं बरं वाटलं होतं आणि वेळेवर तू आलाच नाही, पहिला दिवस, सारं काही नवीन म्हणून जरा जास्तच गडबडीने कॉलेजला पोहचले, त्यामुळे सायकलची चावी सोबत घ्यायची विसरले मग काय सारखं माझं लक्ष सायकल कडे लागलेलं... "

" हि गडबड झाली तर... मग परत येतांनी? "

" तेच तर सांगते, मी बाहेर आले तेव्हा बघते तर काय सायकलला चावीच नव्हती, थोडं घाबरल्यासारखं वाटलं तू असतास तर जरा मदत झाली असती पण... मग मला वाटलं कुणी तरी चावी काढून घेतली असेल, मला काही सुचत नव्हतं... मी सहज म्हणून वॉचमन काकांना विचारलं की माझ्या सायकल ची चावी तुम्हाला दिसली का? तर सुदैव माझं कुणी तरी एक मुलाने चावी त्यांच्याकडे दिली होती... "

" अरे वा ! हे एक ठीक झालं... "

" हो, नाहीतर आज चांगलीच पंचाईत झाली असती... तो मुलगा नाही मिळाला त्याचे आभार मानले असते... "

" असेल कुणीतरी... "

असं बोलतच आम्ही गावात पोहोचलो आणि आपापल्या घरी आलो... मी सायकल घरी उभी केली आणि लगेच धावतच कबीर जवळ गेलो...

" कबीर... कबीर... मला काही सांगायचं... आज एक गंमत झाली... "

त्याने हिरवीगार पान हलवून जणू मला विचारलं ' काय झालं दोस्ता...? '

" अरे आज ना, मी आणि ती सोबत घरी आलो... तसं आम्ही आज सोबत कॉलेजला जायचं ठरवलं होतं पण माझी सायकल वेळेवर पंक्चर झाली होती म्हणून जाऊ नाही शकलो... आणि... मी त्याला परत येतांनी आमचं जे काय बोलणं झालं ते सारं सांगितलं अन त्याच्या आडोश्याला बसलो... "

त्याच्या सहवासात खूप छान वाटायचं...

" खरी गंमत तर अजून बाकी आहे "

त्याच असं झालं की मी लवकरच सायकल दुरुस्त करून कॉलेजला गेलो होतो... ती सायकल लावून आत गेली होती तर मी तिने कुठे सायकल लावली हे पाहत होतो आणि तिच्या सायकल जवळ जाऊन बघतो तर काय?

*तिने नुसती सायकल उभी केली होती, सायकल ला चावी तशीच होती... मला नेमकं काय करावं सुचत नव्हतं, आत जाऊन तिला शोधून चावी देणं मला जमलं नसतं म्हणून जरावेळ विचार करून मी ती चावी वॉचमन काकांना दिली... अन त्यांना सायकल जवळ नेऊन त्या सायकल हि चावी आहे असं सांगितलं... दिवसभर तिथं थांबणं मला शक्य नव्हतं मग मी घरी परतलो, पण तिला सुटी झाल्यावर चावी मिळेल कि नाही याची काळजी मला होती... शेवटी वाट पाहत बराच वेळ झाला असे मला वाटलं... ती आली की नाही हे पाहायलाच मी बाहेर पडलो होतो पण ती यायची होती म्हणून मी पुन्हा परत तिथं गेलो... अशी झाली आज गंमत...*

ती पुढं वाचणार इतक्यात तिचा मोबाईल वाजला. तिने मोबाईल हाती घेतला तर सुजित चा फोन आल्याचं तिला समजलं...

" हॅलो... सुजित "

" हॅलो... "

" बोल ना सुजित काय म्हणतोस? कुमार कसा आहे? "

" कुमार शुद्धीवर आला... जवळपास अर्धा तास झाला... "

" तब्येत कशी आहे आता त्याची... "

" अजून कुणालाही त्याला भेटू दिलं नाही. डॉक्टर त्याला चेक करत आहेत... "

" बरा आहे ना तो? आता वेळ खूप झाला नाहीतर मी आले असते त्याला भेटायला... तर मी उद्याच येईल... "

" डॉक्टर ICU मधून बाहेर आल्यावर कळेल कि त्याची तब्येत कशी आहे... ठीक आहे तू ये उद्या... "

" हो. तिथं आल्यावर तुला फोन लावणार "

" हो चालेल, बरं तुला मी एक बुक तुझ्या बॅगमध्ये चुकून आल्याचं विचारलं होत, तूला मिळालं का? "

" हो मिळालं ना... "

त्यावर तिला विचारावं कि तू वाचलं का कुमारने लिहिलेलं... असं त्याला वाटलं पण त्याने तिला विचारलं नाही... त्याला तसं जमलं नाही " ठीक आहे येतेवेळी सोबत आणशील ते बुक " फक्त इतकंच तो बोलला.

सुजितला सांगावं का? कि मी कुमारची डायरी वाचत आहे ते असं तिला तिच्या मनात एक क्षणासाठी येऊन गेलं... पण ती सुध्दा फोनवर तसं काही एक बोलली नाही... " ठीक आहे मी आणते सोबत ते बुक येतेवेळी... बरं मी फोन ठेवते "

त्यावर " हो ठीक आहे गुड बाय " म्हणत दोघांनी फोन ठेवला...

डायरीत एक बोट ठेवून ती तशीच तिच्या हातात धरलेली... दुसऱ्या हाती मोबाईल... समोर काय आहे आणखी असं स्वतःला विचारत ती पुढं वाचणार तोच तिचा मनात एक प्रश्न आला... हि डायरी सुजितने तर वाचली नसेल ना? अजून कुणाला माहित आहे हे डायरीचं गुपित...

वाचक मित्र हो

नमस्कार

“मला काही सांगायचंय” या कादंबरीचा हा दुसरा भाग आपल्याला कसा वाटला? कृपया मला खालील फ़ोन क्रमांकावर किंवा मेलवर कळवा.

धन्यवाद

प्रफ़ुल शेजव

ई मेल : praful101shejao@gmail. com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान